

कोपरगांवच्या गंगेचा देखावा.



ज्यांत रामचंद्र पाटील उभे आहेत
त्या साठ्यांचे (हल्लीं नवलकरांचे)
वाड्याचे मुख्य दरवाज्याचा देखावा.

२८४



शिर्डी येथील दिव्याचे घरासहीत
लेंडीवरील देखावा.



श्री. अमीदास मेथा यांच्या समाधीवर
त्यांच्या पादुकांच्या स्थापनाविधीचा
देखावा.

21-2-12.

I got up as usual but my prayer was disturbed by the noise which Devaji whom we call Sakshatkaribwa made. I managed to control my mind and finished my prayers. Later we saw Sayin Maharaj go out and held our Panchadashi class. After it I went to the Musjid and saw Sayin Baba being served by Baroda ladies of the Shirke family. A dancing-woman of Bombay arrived today and sang in few songs in the Musjid. She says she is a pupil of Balkrishnabwa. Sayin Baba heard her songs. Then the midday Arti passed off as usual. Sayin Baba was in a very good mood. After midday meal I lay down for a while and then continued our Panchadashi class with our usual members. About sunset I went to see Sayin Baba at his evening stroll and again after Wada Arti for the the Shej Arti. The processions and other arrangements were very grand today. The Bhajan was with cymbals and all. The Bombay dancing girl gave a few songs in the Musjid also after the Shej Arti. At night Bhishma read Bhagwat and Das-Bodh.

22-2-12.

This morning there was Kakad Arti and we all attended it. The ladies of the Shirke family went away soon after the Arti with their attendants. The Bombay dancing girl also went away with her men. She said she wished to go to Amraoti. We held our Panchadashi class. After it I learnt that my wife had a dream this morning that Sayin Baba sent her a message by Bandu to go atway today before 9a.m. Sayin Baba also asked Dada Kelkar and Bala Simpi whether I was talking of going away. There is note from Natekar (Hansa) that I would be permitted to return to Amraoti about the end of this month. All this raised the hopes of my wife, but at the midday Arti time there was no mention of the matter made by Sayin Baba. Madhaorao Deshpande returned in time for the midday Arti from Harda. His wife and children also came from Ahmednagar. After the midday meal I lay down for a while and then continued our Panchadashi class till nearly nightfall when I hastened to the Musjid, saw Sayin Saheb and took Udi. At night Bhishma read Dasbodh and Bhagwat and had Bhajan. Mr. Bhate, Mr. Bapu saheb Abkari Inspector and some children of the latter

came to see me at night and we sat talking for some time on the usual subjects of the wonders daily worked by Sayin Baba. Madhaorao Deshpande was also present then.

23-2-12.

I got up as usual, prayed and in the morning held the Panchdashi class. Besides our usual members a lady from Nasik by name Mrs. Sundarabai was present. We saw Sayin Baba go out and again at the Musjid after he returned to the Musjid. He told me a story, how, when he was young, he went out one morning and suddenly became a girl and continued to be so for some time. He did not give many details. The midday Arti passed off as usual. Many people came to worship today. After the midday meal I lay down for a while and then continued our Panchadashi class. Madhaorao asked Sayin Baba today about my return and got a reply to the effect that times being very unfavourable to me I would have to remain here a few months more. In the evening we went to see Sayin Baba, at the evening stroll and then after the Wada Arti. Here was Shej Arti and later on Bhishma read Bhagwat and Dasa Bodha.

24-2-12.

I attended the Kakad Arti and then held our Panchdashi class. We saw Sayin Maharaj go out and later on attended the Musjid for the midday Arti. Everything went off very much as usual and after the midday meal I lay down for a while. Mr. Sane Mamledar of Kopargaon and Mr. Nanasaheb Behere Revenue Inspector came with Balasaheb Bhate and sat talking for some time. After they went away we continued our Panchadashi class but the progress was very slow. We saw Sayin Baba at his evening stroll and in the evening the Nasik ladies assisted in the Bhajan after the Wada Arti. They have good voices but they appear to be very weak and can make no sustained effort.

ति० रा. रा. काकासाहेब यांस कृ. सा. न. वि. वि.

आपल्या खुशालीसंबंधानें कांहींच न समजल्यामुळें काळजी वाटत आहे. तरी पत्रदर्शनीं खुशाली कळवावी. रा. रा. आत्माराम बाळाजी ढोंगर्डेकर कैलासवासी झाल्याचें दुःखद वर्तमान आपणांस समजलेंच असेल. बाबांचा मोठा भक्त होता.

आपण आपल्या मासिक पुस्तकांत " श्री बाबांच्या " ह्यातींतल्या गोष्टी प्रसिद्ध करीत असतां; पण आपण त्यांच्या स्वर्गगत होण्यानंतरच्या ( चर्मचक्षूला ते दिसत नाहीं पण ते अजूनही तेथें आहेत ) लोकांच्या अनुभवाच्या गोष्टी प्रसिद्ध करण्याचा विचार जाहिरातरूपानें प्रकट केल्यास पुष्कळ भक्तांकडून आपले अनुभव प्रसिद्ध होण्यासाठीं आपणाकडेस येतील. योग्य वाटल्यास उपयोग करावा.

मला सुमारें पांचसहा महिन्यापासून मलेरिया तापानें गांठलें होतें. औषध चालू होतें, पण पाळ्या चुकत. शेवटीं शेवटीं त्या तापाने आपलें खरें स्वरूप प्रकट केलें. विषम होऊन एकत्रीस दिवस बिछान्यांत बेशुद्ध स्थितींत पडलों. दिवसेंदिवस ताप वाढतच जात होता. डॉक्टर, वैद्य व इतर आप्त, स्नेही वगैरे यांनीं आशा सोडली.

ज्या दिवशीं तापाची मुदत ( २१ दिवस संपली ) संपत आली त्या दिवशीं तर सर्वांच्या आशेचा भंग झाला. संध्याकाळीं मुलगा चि. गणपत रामचंद्र नाईक हा एल्. एल्. बी. झाल्यामुळें घरांतील श्री अक्कलकोट स्वामी महाराज, श्री साईनाथ महाराज व श्री. दत्तोपंत बाळेकुंद्री महाराज, व माणिक प्रभु यांच्यासाठीं नेहमीपेक्षां मोठे कमालखानी हारतुरे व पेढे घेऊन घरीं आला. त्याला हा प्रकार पहातांच जगरीतीप्रमाणें वाईट वाटलें; पण त्याची भावना श्री. सद्गुरु बाबा साईनाथ यांच्यावर इतकी दृढ होती व आहे कीं, त्यांनीं सर्व चेहेऱ्यांस हार घालून व नैवेद्य दाखवून श्री समर्थां-च्यावर आपला भार घालून स्वस्थ बसला. रात्रीं सुमारें १ वाजतां अंगांतून

घाम येऊं लागला. मला हळू हळू शुद्धी येऊं लागली होती. माझ्या नाकावर सूत ठेऊन डॉक्टराला बोलावणें पाठविलें होतें.

इतक्यांत माझा बिछाना " श्री साईनाथ महाराज " यांच्या मोठ्या फोटोखालीं होता, तेथून त्यांस घातलेला फुलांचा हार न तुटतां माझे गळ्यांत पडला (हें तेथें जमलेल्या सर्व मंडळीनें पाहून मला नंतर सांगितलें) श्री समर्थांनीं त्याच वेळीं माझ्या हाताला धरून उठविलें व सांगितलें की, "निजतोस काय; शिर्डीला केव्हां येणार ? मी तुझी वाट पहात आहें.शिर्डीला येशील तेव्हां नेहमींप्रमाणें कांहीं दिवसांसाठीं रहावयास न येतां लवकरच सर्व संसाराचा भार मुलावर टाकून पेनशन घेऊन माझी सेवा करण्यासाठी तेथें येऊन रहा. मी तुझा व तुझ्या कुटुंबाचा परामर्श घेईन. आतां तरी मीच आलों किंवा नाहीं ?"

याच रात्रीं डॉक्टर आले व मला बिछान्यावर बसलेला पाहून आनंदानें म्हणाले " आतां हरकत नाहीं वेळ निभावली. असो. शक्ती येईल." मी उदी घेऊन व प्रसाद तोंडास थोडासा लावून पुन्हां झोंपी गेलों. सकाळीं कितीतरी थोडासा हुशारी वाटली. मी चार महिन्याचे रजेवर आहे. अझून शक्ती आलेली नाहीं. हवेसाठीं जाणार आहे पण बाहेर गांवीं थंडीत एकटें जाणें हे ठीक दिसत नाहीं सबब येथेच राहिलों आहे. पुढच्या महिन्यांत बहुधा बाहेरगांवीं जाईन म्हणतों.

आपला नम्र सेवक

**रामचंद्र केशव नाईक.**

## ॥ श्री सांईमाउली प्रसन्न ॥

बांद्रे ता. २५-१-२५

मित्रवर्य श्री. रा. रा. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांस.

श्री सांईलीला कचेरी

५ टर्नररोड बांद्रे

वि. वि. ह्यासोबत माझ्या एका परमप्रिय मित्राची हकीकत मी पाठवित आहें. तरी त्यांतल्या आपणांस योग्य त्या गोष्टी प्रसिद्ध करण्यासारख्या वाटल्यास त्याप्रमाणें श्रीसांईलीलेंत प्रसिद्ध व्हाव्या.

आम्ही सर्व मंडळी सुमारें २५।३० स्त्रिया व पुरुष, ता. ६ सप्टेंबर १९१० रोजीं दादरहून निघून दुसऱ्या दिवशीं सुमारें ९।१० वाजतां सद्गुरू माउलीच्या चरणापाशीं सादर झालों. माझ्या मित्राच्या मनांत दर्शन घ्यावयाचें विशेष कारण हें होतें कीं, आम्ही सर्वांनीं त्या पूर्वी दोन तीन महिने ह. भ. प. श्री दासगणु ह्यांचीं प्रेमळ कीर्तनें ऐकलीं होतीं. व जरी माझा मित्र एक अस्सल प्रार्थनासमाजिष्ट व मूर्तिपूजेविरुद्ध होता तरी त्याच्या मनांत त्या कीर्तनामुळें साकाराची, सगुण उपासनेची गोडी उत्पन्न झाली व त्यामुळें श्री साई बाबांच्या दर्शनाची उत्कंठा झाली. आम्ही दर्शन घेतल्याबरोबर श्री साईबाबांच्या शांत व प्रेमळ चर्येवरून माझ्या मित्राच्या मनावर गोड परिणाम झाला. पण त्याला आंतून एकसारखा निदिध्यास लागला होता कीं आपण सत्पुरुष आहांत हें जाणण्याची मला मुळींच अक्कल नाहीं, तर इतरांप्रमाणें मी आपणापुढें कापूर उदबत्ती जाळून व नारळ ठेऊन आपली व माझी निष्कळ फसवणूक तर करीत नाहींना ? असा एक सारखा विचार चालला होता. एव्हढयांत श्रीनीं विचारलें, "हा कोणाचा नारळ ?" कोणी म्हणाले, 'ह्यांचा" (माझ्या मित्राचा). बाबा म्हणाले, "घे" आणि माझा मित्र उठून, प्रसाद घेतो एव्हढयांत बाबा मोठ्यानें बोलले, "ह्या गडयाला उठाला बसाला लय वखत लागतो." सर्व मंडळी खदखदां हांसली. पण माझ्या मित्राला

तो योग्य तो खुलासा वाटला. ( निश्चय दृढ करण्याचा ) व प्रसाद देतांना तात्काल मनांत दृढ निश्चय केला "बाबा मला कांहीं कळत नाहीं; या उपरांत मी सर्व भार आपणांवर टाकतों" हें त्यांनी मनांत म्हटलें व बाबा मोठ्यानें 'बरें' म्हणाले. त्याचा विस्मय वाटून व पुन्हां थोडा विकल्प उत्पन्न होऊन व इतर सर्व जाडे जाडे विद्वान् शास्त्रें पुराणें वाचलेले, व आपण त्या बाबतींत निव्वळ अज्ञान असें वाटून मित्र मोठ्यानें व कळकळ्यानें बोलला "बाबा, आपणांला प्रश्न विचारूं का?' बाबा बोलले 'विचार'. मित्र म्हणाला, 'बाबा, आपली कृपा सर्वांवर सारखी आहे का?' बाबा मोठ्यानें गर्जून म्हणाले, "प्रश्न विचारायला अक्कल लागते. हें काय काय भलतेंच विचारतोस? माझी नजर सगळ्यांवर सारखी आहे." हा बाबांचा जबाब ऐकण्यावरोबर पुन्हां सर्व मंडळी मोठ्यानें खो खो करून हांसली. परंतु त्या हांसण्याचा मित्रावर मुळींच अनिष्ट परिणाम न होतां, त्याला अत्यंत हुषारी व उमेद वाटली, व मनाला फार धीर आला, कीं आपल्याला पाठीराखा आहे. आतां कसलीच फिकीर नाहीं. तो त्याचा अनुभव अद्याप पावेतों उत्कट रीतीनें जागृत आहे.

त्या नंतर मित्राला वाटलें, कीं आपणांला इतरांप्रमाणें कांहींतरी इष्ट दैवत असावें, कीं ज्याचें ध्यान व चिंतन करण्यास ठीक पडेल. असा विचार करीत व इकडे आरती चालली आहे अशा वेळीं जी समोर जुन्या शाळेची बारी आहे व जेथें रोज संध्याकाळीं राधाकृष्णाबाई बत्या लावीत असे, तिकडे नजर गेली; तर त्या बारींतून एक अत्यंत लावण्यवती व तेजस्वी स्त्री अमोलिक दागिने घातलेली, उत्तम वस्त्र परिधान केलेली मित्राकडे एक सारखी पाहत असलेली त्यानें पाहिली. अशी स्वरूपसंपन्न स्त्री त्यानें जन्मांत पाहिली नव्हती व त्या नंतरही पाहिली नाहीं. जरी श्रीमंत गायकवाड सरकारच्या तोषाखान्यांतील सर्व अमूल्य दागिने त्याला पूर्णपणें माहीत होते, तरी त्या स्त्रीनें परिधान केलेलें वस्त्र व दागिने कितीतरी पटीनीं श्रेष्ठ व अप्रतीम होते! माझा मित्र क्षणभर आनंदांत व आश्चर्यांत

गर्क झाला. तरी पण आपण कुणाच्यातरी बायकोकडे पाहत आहोंत व हें गैर करीत आहों असा विचार येतांच तिकडून नजर फिरवून व श्रीकडे पाहतांच श्रीची नजर एका विशिष्ट प्रकारानें व प्रीतियुक्त अशी आपणांकडे लागली आहे हें पाहतांच मनांत अत्यंत खजिल झाला. व पुन्हा त्या बाजू कडे पाहवयाचें नाहीं असा निश्चय केला. आरती चालली होतीच. मित्रानें मागील प्रकार मनांतून साफ काढून टाकला व साहजिकपणें इकडे तिकडे पाहतां त्या बारीकडे नजर जातां, पुन्हा त्या स्त्रीचें दर्शन झालें, व त्यामुळें आश्चर्य वाटलें ! पण ह्यावेळीं झट्कन मन दाबून श्रीच्या मुखाकडे पाहिलें, व त्यांचें तें प्रेमपूर्वक आपणाकडे अवलोकन पाहून, त्या बारीकडे पुन्हां पाहण्याचें सोडून दिलें. तरी मनांत हेंच आश्चर्य वाटलें कीं इतकी सुस्वरूप स्त्री इतक्या मूल्यवान अलंकारांनीं भरलेली अशा एका खेडेगांवांत बिन-धास्त रहाती हें कसें ?

त्या नंतर ते आणखी दोन वेळां शिर्डीस गेले तेव्हां पुन्हा त्याच बारींत त्याच स्त्रीचें दर्शन झालें. तिसऱ्या खेपेनंतर स्नेही बाळकराम यांज-पाशीं मुंबईंत गोष्ट चालली असतां बाळकराम म्हणाले कीं ती साक्षात् अन्नपूर्णा माता होती व त्यांनाही तिचें दर्शन घडलें होतें. बाळकराम नंतर थोडयाच दिवसांनीं चाकरी, मुलेंबाळें सोडून श्रीसांईबाबांच्यापाशीं कायम सेवा करण्यास गेले.

असो. मध्यंतरीं श्री बाबांचें ध्यान हळू हळू माझ्या मित्राच्या हृदयांत बसलें व त्याला श्री अन्नपूर्णेची उपासना करण्याचें कारण राहिलें नाहीं. तथापि मित्र असें म्हणतात कीं, ते लहानपणापासून स्त्रीद्वेष्टे होते. परंतु श्री अन्नपूर्णेचें दर्शन घडल्यादिवसापासून स्त्री जातीविषयी आदर उत्पन्न होऊन तिरस्कार नाहींसा झाला.

मित्राचें दुसऱ्या खेपेचें जाणें ६ डिसेंबर १९१० मध्यें झालें. त्या वेळीं मुख्य कारण हें होतें कीं, श्रीच्या पायांजवळ बसल्यानें मनाला संतोष, सुख होतें आणि संसाराच्या दगदगीचा विसर पडतो ह्या भावनेनें

मित्र गेला असतां त्याला तिकडे अगदींच विपरीत प्रकार दिसून आला. रा. साठ्यांच्या वाड्यांत पाऊल टाकतां क्षणींच, एक्या जाड्या विद्वानानें 'शिर्डीस येण्याचें प्रयोजन काय ?' वगैरे सवालांनीं त्याला भंडावून टाकलें व दुसऱ्या एकानें स्थितप्रज्ञ म्हणजे काय ह्याचा खुलासा व्हावा म्हणून सारखी टकळी मांडली. परिणाम असा झाला कीं, दोन तासाच्या अवधींत त्याचें मस्तक भणभणलें व त्यानें मनानें बाबांचा धांवा केला कीं, 'हें काय ? मी आपल्या पायांपाशीं शांतीची याचना करण्यासाठीं आलों असतां हें माझ्या पाठीमागें काय नसतें लचांड लागलें आहे ? मी तेथें (मुंबईत) बरा होतों.' असें मनांत म्हणत म्हणत श्रींच्या दर्शनास गेले. पायांवर मस्तक ठेवतांच बाबा माधवरावजीस म्हणाले, "शामा, ह्याला कांहीं सांग." माधवराव-जींनीं मला हकीकत विचारली व मी सकाळीं घडलेला प्रकार त्यांना सांगितला. ते म्हणाले, "हीच तर देवाची (साईबाबांची) लीला. देवानें ह्या प्रकारानें असें सुचविलें कीं संसारांत असेच प्रसंग यावयाचे, तर तेथें मुळींच लक्ष न देतां सर्व प्रकार पाहून व मन त्यांत न घालून तें देवाच्या पायांशीं निश्चळ ठेवावें, म्हणजे त्यांत खरें समाधान आहे" असें बोलून ते दोघे पुन्हा बाबांच्या दर्शनास गेले. जातांक्षणींच बाबा सुप्रसन्न मुद्रेनें आशीर्वाद देऊन म्हणाले, "शामानें सांगितलें तसें वागत जा." त्यानंतर संसारांत अनेक संकटें व वादावादीचे वगैरे प्रकार आले व येत आहेत. त्या सर्वांतून श्रींच्या पूर्ण कृपेमुळें माझा मित्र अद्यापपर्यंत पार पडला आहे.

ह्यानंतर श्री साईबाबांच्या सहज लीलेचे अनेक अनुभव माझ्या मित्राला व त्याच्या कुटुंबांतील लहान थोर सर्व माणसांना दिसून आले व अद्यापि श्रींच्या देहपातानंतरही येत आहेत व आमचा पाठीराखा अद्यापि सतत उभा आहे असें त्यां सर्वांस खात्रीपूर्वक वाटून त्यांचें समाधान होत आहे. ज्या स्थितींत बाबा ठेवतील ती स्थिती त्यांना सदैव सर्वस्वी प्रमाण.

तिसऱ्या खेपेला माझ्या मित्राची बायको त्याच्या बरोबर शिर्डीला पहिल्यानें गेली. मित्रानें आपल्याबरोबर नेलेली ( संकल्प केलेली ) सर्व दक्षिणा श्रीच्या स्वाधीन केली. त्यानंतर बाबांनीं मित्राच्या कुटुंबाजवळ सहा रुपये दक्षिणा मागितली. बाईला वाटलें कीं ते निव्वळ रूपये. परंतु मित्राला तसें वाटेना. त्या दिवशीं दोन प्रहरीं व दुसऱ्या दिवशीं सकाळीं बाबांनीं सहा रुपयांची कळकळीनें मागणी केली. बाई वाड्यांत आल्यावर रडूं लागली. मित्रानें तिची समजूत घातली कीं, ते चांदीचे रूपये नव्हत. परंतु षड्रिपूंची मागणी आहे, व तुझा बाबांवर सत्पुरूष ह्या नात्यानें पूर्ण विश्वास असेल व बाबांवर भार ठेवल्यानें तुझें जर कल्याण होईल असें खात्री पूर्वक वाटेत असेल तर येथें ( वाड्यांत ) बसून मनोभावानें सहा रुपये म्हणजे " षड्रिपू तुम्हाला मी अर्पण केले आहेत " असें बोल, म्हणजे पहा कशी गम्मत होते ती. तिनें त्याप्रमाणें केलें, व तीं उभयतां दोनप्रहरीं श्रीच्या चरणापाशीं गेलीं. जातांच बाबा म्हणाले, " आई, माझे रुपये आणलेस ? " बाई म्हणाली, " बाबा, मी ते तुम्हाले दिले. " बाबा म्हणाले, " खचित दिले ? " बाई म्हणाली, " होय खचित दिले. " तेव्हां बाबा म्हणाले, " पहा हो फिरशील ! ". आतां जर चांदीच्या रुपयांचीच मागणी होती तर फिरशील ह्याचा अर्थ काय ?

असो. ह्या प्रमाणें श्रद्धापूर्वक वर्तन ठेवलें असतां ईश्वर क्षणभर तरी उधारी ठेवतो काय ? बाई बाबांची सेवा करीत बसली होती. तिच्या डोक्यावर आपला वरदहस्त ठेवून व आस्ते फिरवून बाबा म्हणाले, " आई, आपलं डोकं लयी दुखतं. नाहीं ? " ( त्या बाईचें डोकें सतत सहा सात वर्षें एकसारखें दुखत होतें, व यामुळें तिला फार त्रास झाला होता, परंतु डोकें बरें व्हावें या हेतूनें ती शिर्डीस गेली नव्हती. ) बाबांनीं ह्याप्रमाणें प्रश्न विचारतांच बाई म्हणाली, " बाबा, या घडीपर्यंत डोकं दुखत होतं. आतां मुळींच दुखत नाहीं. " बाबा म्हणाले, " आई, आतां आपलं डोकं नाहीं दुखायचं बरं. "

आणि त्याप्रमाणें ह्या गोष्टीला आज सुमारें १४ वर्षें झालीं आईचें डोकें दुखलें नाहीं.

बाबा नंतर म्हणाले, " आई, तूं मला चांगलें चांगलें खाऊं घालीत होतीस, पण आतां मला विसरलीस. " बाईला आश्चर्य वाटून ती म्हणाली, " बाबा, मी तर तुम्हाला आतांच पाहतें." बाबा म्हणाले, " अग, मी तर तुला लहान होतीस तेव्हांपासून पाहतों." ह्या गोष्टीचा तिला स्वाभाविक-रीतीनें उलगडा होईना. तेव्हां बाबा म्हणाले, "आई तुझ्या घरीं कोण दैवत आहे ? " ती म्हणाली, "गणपती" ( ह्या गणपती विषयीं पुढें सुरेख संवाद येईल ). बाबा पुन्हा म्हणाले, "तुझ्या आईच्या घरीं कोण दैवत होतें ?" ती म्हणाली, " गणपती" व स्वाभाविकरीतिनें लहानपणाची आठवण होऊन म्हणाली, " बाबा, मी लहानपणीं घरांत आलेल्या जिन्सांपैकीं उत्तम फळें फुलें, खारका, बदाम, नारळ वगैरे गणपतीपुढें ठेवीत असें." बाबा म्हणाले, "ते सर्व मला मिळत असत आणि तेव्हांपासून तुला पाहतों." त्या नंतर म्हणाले, " तुझा गणपती सुरेख मुगत आहे." तेव्हां तिला आठवण होऊन ती म्हणाली, "बाबा, तो उजव्या सोंडेचा आहे आणि त्याचा एक हात मोडलेला आहे. लोक सांगतात अशी मूर्ति घरांत ठेवूं नये, पाण्यांत सोडावी." तेव्हां बाबा म्हणाले ."आपल्या मुला लेकराचा हातपाय उडवा तर आपण त्याला बुडवितों का ? तो गणपति लई लकी आहे. त्याची पूजा अर्चा रोज करीत जावी " त्यानंतर म्हणाले "आई, मला तुझ्या घरीं रोज तीनदा यावें लागतें." असें म्हणून घराच्या खाणाखुणा सर्व इतक्या स्पष्ट रीतीनें सांगितल्या कीं ती आश्चर्यचकित झाली मित्र कोठें निजतो, बाई कोठें निजते, मुलगा कोठें निजतो देवाचा देव्हारा मागला पुढला व्हेरांडा वगैरेची इतकी बारीक माहिती सांगितली, कीं बाईला हेच साक्षात् परमेश्वर आहेत अशी तिची पूर्ण खात्री झाली व तिचा त्या प्रकारचा बाबावर जो दृढ-विश्वास बसला, तसा विश्वास बसवयास माझ्या मित्राला त्यांच्या चिकित्सक बुद्धीमुळें त्याला अनेक वर्षें लागलीं. सारांश, षड्रिपु अर्पण

केल्याची उधारी देवानें तात्काळ फेडून टाकली. खऱ्या श्रद्धेची फेड अशीच होत असते.

ह्याच वेळेला माझ्या मित्राला एक विलक्षण आर्शीवाद दिला. त्यावेळीं त्याचें आंग प्रेमानें थरारून आलें, व त्याला अत्यंत संतोष वाटला. आश्चर्याची गोष्ट ही कीं बाबांनीं ते शब्द एवढ्या मोठ्या आवाजानें उच्चारले होते तरी पण एका क्षणापूर्वीं दीक्षित यांनीं बाबांच्या पायांवर मस्तक नम्र केलें, नंतर मित्रानें, व नंतर काका महाजनींनीं, असें असतां मित्राला पायां पडतांना जो आर्शीवद दिला तो दीक्षितांना व काका महाजनी यांना ऐकूं आला नाहीं. बाबांच्या लीला अगाध आहेत.

मित्राच्या मनांत श्री राम नामाचा त्रयोदश अक्षरी तारक मंत्राचा जप सारखा चाललेला असे. त्याची खूण देण्यासाठीं, बाबा एके दिवशी दोन हात जोडून नमस्कार करून म्हणाले, “ यावे रामचंद्र महाराज. ” मित्र ह्या सत्कारानें बराच गोंधळून गेला, पण जेव्हां त्याला समजलें, कीं नमस्कार श्रीराम नामाला आहे, तेव्हां त्याला आनंद वाटला.

एके वेळीं मित्राच्या बायकोनें मुंबईस त्यांच्या राहत्या घरीं एक रुपया मागितला. तिला रुपयाची गरज होती, व मित्राला स्टेशनावर जावयाचें होतें. त्यानें आपली पिशवी उघडून पाहिली, तिच्यामध्यें एक दहा रुपयांची नोट होती. सुटे रुपये नव्हते, तेव्हां तो म्हणाला कीं नोट मोडून तुला संध्याकाळीं रुपया देईन. घराचा दादर उतरतांना व साहजिक रुमालाचा खिसा चांचपतांना त्यांत एक रुपया सुटा असलेला त्याला आढळला. त्या वेळीं त्याचें कर्तव्य होतें कीं तो रुपया तात्काळ बायकोला द्यावा. तसेंच गाडी पकडावयाला अवकाश पण होता. तरी तसें न करतां तो आपल्या कचेरींत गेला व रुपया संध्याकाळीं बायकोला दिला.

ही गोष्ट घडल्यानंतर तीन चार दिवसांनीं उभयतांना शिर्डीस जाण्याचा योग आला. दुसरे दिवशीं तीं बाबांच्या चरणापाशीं बसलीं असतां

बाबा म्हणाले, "आई, लोक काय लबाड झाले आहेत. खिशांत पैसा असून नाहीं म्हणून सांगतात." बाईला ह्या गोष्टीचा उलगडा झाला नाहीं. परंतु मित्राला फार शरम झाली व एक तऱ्हेचा आनंदही झाला कीं, बाबा आपल्या लहान सहान सर्व कृत्यांवर सारखी नजर ठेवीत आहेत व त्यामुळे आपणांला त्यांचें प्रत्यक्ष पाठबळ आहे.

एके वेळीं मुंबईस जाण्यासाठीं रजा घेतांना मित्राच्या डोळ्यांत अश्रु आले, तेव्हां बाबा म्हणाले, "हे काय वेडयावानी करतोस? मी तिकडे नाहीं का तुजपाशीं?" मित्र म्हणाला, "तें मला कळतें पण अनुभव नाहीं." तेव्हां बाबा म्हणाले, "अरे, ज्याला वाटतें कीं बाबा शिरडींत आहे त्यानें बाबाला मुळींच नाहीं बघितलें." अलबत मित्राला त्याचें आश्चर्य वाटलें. परंतु तात्काळ त्याला बाबांचें बोलणें पटलें कीं, खरें बाबांना पहाणें म्हणजे आत्मसाक्षात्कारी होणें.

एके वेळीं माझा मित्र व बाबा हे दोघेचजण मशिदींत होते. मित्र बाबांची सेवा करीत असतां बाबांना हळूच म्हणाला, "बाबा, आपला वरदहस्त माझ्या शिरावर आहे तर आपण मला ह्या देहांतून आतां सोडवा." बाबा म्हणाले, "हें काय येडयावानी बोलतोस? अजून लय काम आहे." मित्र म्हणाला, "आपली मर्जी." ही गोष्ट तो कुणाही दुसऱ्यापाशीं अगर स्वतःच्या बायकोजवळ देखील बोलला नाहीं. त्या नंतर सुमारें दोन वर्षांनीं बाबांनीं देह ठेविला. बाबा हयात असतांना, तसेंच देह सोडल्यावरही मित्र उगाच कुणाला सत्पुरुष सत्पुरुष म्हणून दुसऱ्या कुणाच्याही पाठिस लागला नाहीं. आणि असें करण्याचें त्याला श्री सांई माउलीच्या कृपेनें कांहीं प्रयोजन उरलें नाहीं. कर्मधर्मसंयोगानें त्याच्या मालकाचे सद्गुरू मामलेदार महाराज (जे गुजराथेंत श्री नर्मदेच्या कांठीं मठी बांधून होते) ह्यांची गांठ मालकाचे घरीं झाली. नंतर महाराज मुंबईस आले असतां, मालकाच्या कारखान्यांत गेले. तेथें एका एकांत ठिकाणीं त्यांची व मित्राची गांठ झाली असतां मित्र बोलला, "महाराज, आप जैसे सत्पुरुषका वरदहस्त मेरे

शीरपर है तो मेरेकू ये देहगेसे छोडाना." महाराज तावडतोब बोलले "ये क्या पागलकेमाफक बात करते ! तेरा सद्गुरू का वचन ( बाबांचा विशिष्ट आशीर्वाद ) भूल गया ? अजू बोहोत काम है." हें ऐकून मित्राचें अंतःकरण गार झालें. बाबा जरी देह सोडून गेले तरी साक्षात् कसे खेळ खेळत आहेत हें अनुभवून घेऊन बाबांच्या पायीं मन लीन ठेवलें असतां काय गम्मत होते हें त्याला तात्काळ उमगलें.

माझ्या मित्राला बाबांचें रूप व खेळ हें कांहीं काळपर्यंत कळेनात. ते कळण्यासाठीं त्यानें जेव्हां श्री रामकृष्ण परमहंस, श्री भास्करानंद सरस्वती व त्रैलंग स्वामी इत्यादि महान सत्पुरुष जे थोड्या वर्षांपूर्वीं हयात होते, ह्यांची बंगाली भाषेंत लिहिलेलीं चरित्रें वाचलीं, तेव्हां त्याला श्री साई महाराजांच्या अगाध लीलेविषयीं साधारण कल्पना येऊं लागली व सर्व तऱ्हेचे विकल्प नाहींसे झाले. प्रार्थनासमाजाच्या अननुभवी एकतर्फी व हेकेखोर शिकवणीनें १५व्या वर्षापासून ते ४५व्या वर्षापर्यंत मनांत बसलेल्या परमेश्वर अवतार घेत नसतो या भावनेचा लोप झाला. परमेश्वर जर सर्व शक्तिमान् तर त्याला भक्तांसाठीं अवतार घेणें अशक्य कां ? जर सर्वव्यापी तर तो प्रत्येकाच्या अंतर्यामीं कां नसावा ? जर अंतर्यामी आहे तर भक्ताला आत्मसाक्षात्कार होऊन ईश्वरपदापर्यंत का पोहोंचतां येऊं नये ? जर आधुनिक संतांच्या प्रत्यक्ष अनुभवलेल्या गोष्टी खऱ्या, तर जुन्या संतांच्या त्याच तऱ्हेच्या सर्व गोष्टी भाकडकथा व अतिशयोक्तीच्या कां ? मित्राचे अध्यात्मिक अध्ययन फारच स्वल्प. कारण तो सकाळपासून संध्याकाळपर्यंत राबणारा निव्वळ मजूर. तरी पण महाभारताचें चिपळूणकरांचें मराठी भाषांतर, नाथांचें भागवत व भावार्थ रामायण ह्या ग्रंथांच्या वाचनानें उपनिषदांचा मथितार्थ व बाबांचा उपदेश व शिकवणी ह्यांचा त्याला उलगडा होऊं लागला.

इ. स. १९१७च्या दसऱ्यानंतर माझा मित्र बाबांचें दर्शन घेऊन मुंबईस येऊन नोकरीवर दाखल झाला. त्याच दिवशीं त्याच्या कारखान्याच्या मालकाचा

मुलगा त्याला म्हणाला कीं त्याच्या वडिलांचें पत्र नाशिकहून आलें आहे, तर मित्रानें तातडतोब शिर्डीस जाऊन बाबांपासून प्रत्यक्ष खुलासा घ्यावा कीं त्यानें नाशीकला राहावें, कीं मुंबईस जावें, अथवा शिर्डीस बाबांच्या दर्शनास यावें. त्या गृहस्थाला क्षयाची भावना होऊन त्याची स्थिति फारच बिघडली होती. त्याच्या कुटुंबांतील मनुष्यांची इच्छा ही कीं, मुंबईस औषधोपचार होऊन तबियत सुधरेल. त्याची स्वतःची इच्छा ही कीं, शिरडीस बाबांच्या दर्शनास जावें. हें वडिलांचें पत्र संध्याकाळीं ५।५–१५ दरम्यान आलें. मित्र म्हणाला, "मी आजच शिरडीहून आलों आहे. दीक्षीत तेथें आहेतच. तर त्यांना पत्र पाठवून खुलासा मागवूं या." मुलगा म्हणाला कीं, "वडिलांची खास ही इच्छा आहे कीं मित्रानें शिर्डीस जाऊन बाबांपासून प्रत्यक्ष खुलासा घ्यावा." त्यावेळीं तो शेटच्या मुलाला बोलला, " पहा आपण इकडे गोष्टी करीत आहोंत त्या सर्व बाबांना तिकडे शिर्डीस कळत आहेत. असो. तुमच्या वडीलांची इच्छा म्हणून मी आज रात्रीच्या गाडीनें जातों." त्याप्रमाणें त्या रात्रीं कुटुंबासहित तो निघाला.

इकडे त्याच दिवशीं संध्याकाळीं ५।५–१५ वाजतां शिरडीच्या मशिदींत दीक्षीत वगैरे ३०–४० सद्गृहस्थ बाबांची सेवा करीत असतां बाबा एकाएकी म्हणाले, " काय बाबासाहेब, काय काय गोष्टी चालल्या आहेत ? " पुन्हा, " काय विचार आहे, " " पुन्हा बरें बाबा." दुसरे दिवशीं सकाळीं नऊ दहा वाजतां मित्र शिर्डीस श्रीच्यापुढें हजर होतांच बाबा म्हणाले, " आलास, बरें झालें. काका ( दीक्षीतांस ) काल्च संध्याकाळीं आपण याच्या गोष्टी काढल्या होत्या, नाहीं ? हें ऐकतांच मित्राचा गळा गहिंवरून आला, व विश्वासयुक्त बोलला बाबा कसें तोलून धरतात हें सर्वांच्या दिग्दर्शनास आलें.

पुढें शेटच्या दुखण्याविषयीं व शिरडीस येण्याविषयीं विचारतां बाबा म्हणाले, " मुंबईस जाऊं नको, त्याला तेथेंच ( नाशिकास ) राहूं दे. ती लय चांगली जागा आहे, त्याला शांत राहूं दे. कोणी त्रास देऊं नका. तिकडे

याचें बरें होईल. आपल्या पायीं चालता येईल." शेटजी पुढें तबियत बरीच बिघडली. तो गृहस्थ कोट्याधीश शिकलेला, सवरलेला, विलायतेचा प्रवास करून आलेला, पण बाबांच्या बोलांचा खरा अर्थ स्वतः समजला. मन स्वस्थ करून ठेवलें. मृत्यू जवळ आलेला पाहून पुढें माणसें रडूं लागलीं. त्यांना शांत पण स्वस्थ रीतीनें सांगितलें; "मी तुमच्यासाठी संसारांत पुष्कळ खस्ता काढल्या आहेत, तर आतां यावेळीं मला शांत चित्तानें असूं द्या. कोणाला रडायचें असेल तर त्यानें खोलीबाहेर जावें." असें बोलून बाबांच्या चेहऱ्याकडे नजर लावून दोन हात जोडून "प्रभो हूं तारा पासे आवूं छूं." असें बोलून देह सोडला. हें जेव्हां कळलें तेव्हां बाबांच्या शब्दांचा उलगडा झाला. पायीं म्हणजे पायांनीं नव्हें तर आपल्या यत्नांनीं अथवा माझ्या पायांजवळ. सर्व बोलणें व शिकविणें अध्यात्मिक. इतका श्रीमंत मनुष्य, कितीतरी मोठा त्याचा व्यवसाय, पण काय तयारी! केवढी बाबांवर निष्ठा! किती शांत प्रकारानें व पूर्ण सावधगिरी ठेवून प्रभूच्या पायापाशीं अंतःकाळीं प्रयाण! बोलणें सोपें. वाचन व वायफळ बडबड आपणा प्रत्येकाला करतां येतें पण असा मृत्यु येणें हें कोट्यावधी माणसांतून किती जणांना तरी साधतें? धन्य त्या शेटजीची व धन्यसाईबाबांची! जास्ती काय लिहावें? ह्या शेटनीं शिरडीस जाऊन महाराजांचें साक्षात् दर्शन केव्हांही घेतलें नव्हतें ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. बाबा जाड्या जाड्या विद्वानांना तर अगम्य पण साध्या भोळ्या लोकांबरोबर अत्यंत प्रेमानें व अवखळपणें बोलत असत. माझ्या मित्राच्या धाकट्या मुलाबरोबर एके दिवशीं मोठा वाद जुंपला. बाबा म्हणत 'तुझ्या घरीं येतांना आगगाडी आधीं लागते मग घर.' मुलगा म्हणे 'घर आधीं नंतर गाडी. (गाडी घराच्या मागल्या बाजूनें जाते)' मुलगा व्यवहारदृष्ट्या खरा, बाबा अध्यात्मदृष्टीनें खरे. कांहीं वेळानें मुलाची खात्री झाली कीं बाबा सरळ रेषेनें येणारे. त्यांना अलबत आधीं गाडी मग घर. त्यांना बसल्या ठिकाणाहून सर्व जगांतले व्यवहार दिसतात व कळतात; तर त्याच्या घरीं जाण्यासाठीं पुढच्या दारीं जाऊन दादर चढून वर गाडीवर येण्याचें काय प्रयोजन?

व्यवहारी माणसांना व्यवहार देखील बाबांच्या दरबारांत कसा चोख-रीतीनें झालेला पाहण्यांत येई! एकदां सर्व मंडळी मशिदींत श्री साई-

बाबांचे चरणापाशीं बसली असतां, एक बाई सीताफळांची पाटी घेऊन बाबांपाशीं आली. त्या दिवशीं प्रथमच सीताफळांचा हंगाम सुरू झाला होता. पाटींत सहा सीताफळें. बाबांनीं किंमत विचारली. ती म्हणाली "एक रुपया." बाबा म्हणे "फार महाग, इतक्या किंमतीची आपणाला नकोत. सस्ती होतील तेव्हां घेऊं." बाईनें पाहिलें बाबा घेईनात, (सुमारें अर्धा तास रगझक चालली होती) तेव्हां म्हणाली "बाबा, तुला वाटेल ती किंमत दे; मी बुध्यां कुणालाही न विकतां आधीं तुझ्या दरबारांत आणलीं." सरते-शेवटीं बाबांनीं तीं सहा सीताफळें दहा आण्याला खरीद केलीं. आणि तावडतोब सर्वांना वाटून टाकलीं.

थोडया वेळानें एक दुसरी बाई सीताफळांची टोपली घेऊन आली. पाटींत दहा सीताफळें. बाबा सीताफळें मुळींच घेईनात आणि म्हणाले, "मी आतांच घेतलीं, आतां मला नको." सरतेशेवटीं बाईनें पुष्कळ काकुळती केल्यावर तीं दहा सीताफळें सहा आण्याला घेतली. व तीं तावडतोब वाटून टाकलीं. पहिल्या पाटीवालीला पैशासाठीं एका घंटा-भरानें ये म्हणून सांगितलें, त्याचप्रमाणें त्या दुसऱ्या बाईला सांगितलें. त्या-बाया कांहीं वेळानें आल्या व पैसे मागूं लागल्या. माधवराव जवळ बसले होते. त्यांना बाबा म्हणाले, "शामा, या बायांनीं मला लय त्रास दिला. कायरे यांचा हिशोब झाला?" माधवराव म्हणाले, "या बाईचीं देवा तूं सहा सीताफळें दहा आण्याला घेतलीस, आणि या दुसऱ्या बाईची दहा सीताफळें सहा आण्याला घेतलीस." "हं, तर मग काय हिशोब रे?" माधवराव म्हणाले, "दहा आणे आणि सहा आणे म्हणजे एक रुपया." मित्र जवळ बसला होता त्याला बाबा म्हणाले, "तुझ्याजवळ दोन रुपये आहेत काय?" मित्रानें दोन रुपये खिशांतून काढून बाबांच्या स्वाधीन केले. बाबांनीं प्रत्येक बाईला एक एक रुपया दिला. हा सर्व प्रकार पाहून मित्राला स्वस्थ राहवेना. तो नम्रतेनें बाबांना बोलला, "हें सर्व काय झालें मला मुळींच कळत नाहीं, विचारूं का?" बाबा बोलले, "विचार." तेव्हां त्यानें ह्या सर्व गोष्टीचा खुलासा मागितला. बाब

म्हणाले, "हे बघ, जेव्हां बाजारांत नवा माल येतो तेव्हां त्याला फार दाम पडतोना ?" तो म्हणाला "होय" "तेव्हां जपून खरीद करावें लागतेना ?" तो म्हणाला, "होय." "म्हणून आज नव्यानें मीनाफळें आलीं तेव्हां विचार करून खरीद केली. पुन्हा दुसरी पाटी आली, तेव्हां आपली गरज राहिली नव्हती. म्हणून भाव उतरला म्हणून कमी भावानें घेतली. तूं असेंच करतोस ना ?" मित्र म्हणाला, "होय" व आणखी म्हणाला, "त्यांना (त्या बायांना) घंटाभरानें ये म्हणून कां सांगितलें ?" बाबा बोलले, "अरे माल पारखून घ्यायचा असतो ना ?" नंतर मित्र म्हणाला, "त्या दोन्ही बायांना प्रत्येकी एक एक रुपया कां दिलात ?" बाबा बोलले, "अरे ते त्यांच्या नशीबांत होतें. आपल्यासाठीं येवढ्या कळकळीनें त्यांना फळं आणलीं त्याचा बदला नको का त्यांना द्यायला ?" ह्याप्रमाणें व्यवहारीक ज्ञान व त्या सोबत पारमार्थिक देणें ह्या दोन्ही गोष्टी कितीतरी सूक्ष्मरीतीनें ह्या लहानशा गोष्टीवरून आपल्यासारख्या संसारी माणसांना शिकावयाच्या आहेत ! असे प्रकार बाबांच्या दरबारांत प्रत्यहीं पहावयास मिळत. वरवर पहाणारांस ते विचित्र व विसंगत दिसत.

माळसरच्या महाराजांच्या पायापाशी माझा मित्र बसला असतां त्यानें एक स्वतःच्या डोळ्यांनी चमत्कार पाहिला; तो असा:—ही गोष्ट बडोदा मुक्कामीं त्याच्या यजमानाच्या घरांत वरच्या वरांड्यामध्यें घडली. महाराज राणापुरीं जेव्हां गुहेंतून बाहेर पडत तेव्हां दिगंबर स्थितींत असत. त्यांच्या शिष्यांपैकीं कोणीतरी त्यांच्या अंगावर छाटी टाकीत असे. वरील घरीं एक दोन प्रहरीं महाराज एका आरामखुर्चीवर पडले होते. त्यावेळी प्रेमानंद नांवाच्या प्रसिद्ध वकिलाची वृद्ध आई महाराजांच्या दर्शनासाठीं आली. ती महाराजांच्या खांद्याजवळ बसून गोष्टी करूं लागली. बोलतां बोलतां महाराजांचें संभाषण सर्व स्त्रीवाचक होऊं लागलें. महाराजांचे अंगावर छाटी होती. पण आंत दिगंबरस्थिति असल्याकारणानें व पाय खुर्चीच्या फळ्यांवर होते म्हणून पायांकडे बसलेल्या गृहस्थांस त्यांचें इंद्रिय स्पष्ट दिसत होतें. त्या बाईबरोबर बोलतां बोलतां तें त्यांचें इंद्रिय नाहींसें होऊन तेथें स्त्रीलिंग दिसूं लागलें. हें माझ्या मित्रानें आपल्या डोळ्यांनी स्पष्ट पाहिलें व आश्चर्यचकीत होऊन शेजारच्या मंडळीस पाहण्यास सुचविलें.

ती बाई बोलत होती तोंपर्यंत ही स्थिति होती. तिनें महाराजांची रजा घेतांक्षणींच महाराजांची स्थिति पूर्ववत् झाली. माझ्या मित्राच्यानें राहवेना, त्यानें महाराजांस विचारिलें, "ये कैसा हुवा ?" महाराज जांघेच्या दोन्ही बाजूंकडें बोटें दाखवून म्हणाले, "यहां नस है. वो जब स्त्रीभावना होती है तब खेंच जाते है और स्त्रीरूप होता है." महाराज जुवानपणीं असतांना श्री रामकृष्ण परमहंस यांना बच्चा असलेले पाहिलेलें सांगत. यावरून त्यांच्या उमरीची साधारण कल्पना होईल. अशा पूर्ण योग्याला मित्रानें खंडयोगाविषयीं विचारलें. त्यांनीं सांगितलें कीं खंडयोग खरा आहे. आपण या देहांत अनुभवलेला नाहीं. पण पुढल्या देहांत त्याचा पूर्ण अनुभव घेऊं. ह्या त्यांच्या शब्दांवरून बाबांच्या देहाचे तुकडे झालेले ज्यांनी पाहिले, ती हकीकत खरी ठरते.

हे महाराज १९२१ सालीं समाधिस्थ झाले. समाधि घेण्यापूर्वी दोन दिवस शेट विठ्ठलदास चत्रुभूज हिऱ्याचे व्यापारी व इतर मंडळीसमोर महाराज स्पष्ट बोलले कीं ते एक २० वर्षांच्या जुवान तरुणाचा देह धारण करणार आहेत. यावरून श्री साईबाबांचें अयोनिसंभवत्व स्पष्ट कळून येतें.

ह्या सर्व स्थिति वाचकांपुढें स्पष्टरीतीनें मांडून श्री साई माउलीच्या अगाध लीलेविषयीं माहिती व्हावी ह्या हेतूनेंच वरील दाखले दिले आहेत. अशा बाबतींत तुलना करणें ही गोष्ट केवळ गौण व निंद्य.

मित्राला व मला श्री साई माउलीच्या चरणापाशीं अनेक गोड अनुभव आले आहेत व श्रींच्या देहपातानंतरही येत आहेत. परंतु मी आपला वेळ घेऊं इच्छित नाहीं.

श्री साइमाउलीनें पदरांत घेऊन साक्षात् दर्शन देऊन कृतार्थ केलें व ह्यामुळें पायांपाशीं बसणाऱ्या कोणाही बाळकास प्रेमाचा उमाळा येऊन धन्य वाटणें हें साहजिक आहे !

लोभ असावा ही विनंती.

आपला नम्र

**रा. आ. तर्खडकर.**

## शिर्डी येथील शके १८४६च्या श्री गोकुळअष्टमीच्या उत्सवाबद्दल वर्गणी आली तिचा जमाखर्च श्रावण वद्य २ ते श्रावण वद्य ९ पर्यंत.

| जमा | नांवें |
|---|---|
| वर्गणी आली ती. | १२॥ गरीबांस कपडे वाटण्याकरितां |
| ५ रा. रा. त्रिंबक आनंदराव कर्णीक मनीआर्डर | ४८/ ग्यासलेट डबा |
| ५ ,, ,, लक्ष्मण गोविंद मुंगी. ता. २७।८।२३ | १ मिरच्या व हळद मिळून |
| २ ,, ,, नायब आमीन होळकर स्टेट | -॥≶ निम्यास तार सामान आणण्यास भाडें -।/ -।≈ |
| ५ ,, ,, गोवर्धन गीरधर | ६ निमंत्रणपत्रें पाठविण्यास तिकीटें |
| ५ ,, ,, व्ही. कृष्ण पाध्ये २९।८।२३ | २३८/ राहाते येथून सामान खरेदी हस्ते बाळा |
| २ ,, यशवंतराव जनार्दन गाळवणकर | ४१॥।≶॥ मुलतानचंद यांचे सामानाबद्दल दिले. |
| ४४॥≶ रा. पालनजी आदरजी तारापुरवाला हस्ते काकासाहेब. | ९॥≶ श्रीचे देवस्थानाबद्दलचें बिल. |
| ५ रा. रामचंद्र वामन मोडक सांगली | ५ प्रसाद पाठविणें व तिकिटें रुपये टपाल खर्च. |
| १० श्री. अण्णासाहेब यांजकडून | ९७८/ गहूं रूपानें वर्गणी आली ते गहूं खर्ची पडले सबब नांवें. |
| ५ रावसाहेब विनायक गणेश देशपांडे. | ६० गुळ रूपानें वर्गणी आली ती पल्ले दर ३० प्रमाणें गुळ खर्च झाला. |
| ५ डॉ. हिरालाल क्लार्क | |
| १० | १७ गुळ खरेदी शेर ८८६८ |
| ३ रा. वामन चिंतामण मुके | २४। तांदूळ रूपानें वर्गणी आली ती |
| ३ रा. रा. पुरुषोत्तम रघुनाथ आवस्ती | ४॥≶ धर्मादाय वाटण्याकरितां |
| ८८/ श्रीचे पेटींत निघालेलें उत्पन्न दिवस ३ धान्य रूपानें व गुळ व गहूं रूपानें आलेली वर्गणी. | ३।-॥ श्री. अण्णासाहेब यांचा खर्च |
| २१ तात्या पाटील गहूं मण ८१ रोख ७. गुळ १४ | १८/ कार्ड पाठविणें टपालखर्च |
| ५ तुकाराम पाटील. गुळ | १॥ लेबलची किंमत |
| ५ दाजी वामन चितांबर. गुळ | -॥- लेबलस् |
| ६ बाळा बापु जगताप. गुळ | ८≶। लेबलचा टपालखर्च |
| | ३-।-॥ |

६ तात्या बापु जगताप. गुळ
३॥ विठोबा कोते. शेख, गुळ

७ त्रिंबक शेळके गहूं पायली ८८८
१३॥ बापुराव गोंदकर गहूं पा.८८८
७

गुळ ६॥
५। तुकाराम पांडू कोते गहूं पा. ८८६
७-काशीनाथ गांधी राहतेकर गहू ८८८
७ पेमराज विरदीचंद राहातेकर गहू ८८८
७ दौलतराम शेट राहातेकर गहू ८८८
१५ यशवंतराव पुणेकर गुळ शेर ८८६०
६॥. जयराम कोते गुळ शेर ८८२६
.॥।≈ गेनु गोंदकर गहू पायली ८८१
१०॥ मुलतानचंद शेख गूळ ६॥- तांदूळ ४
२॥।. गुळवे पुणेकर तांदूळ पायली ८८२
१।≈ राम खंडू गोंदकर तांदूळ पायली ८८१
५ मामा पुणेकर तांदूळ पायली ८८४
६। रंभा धनगर तांदूळ पायली ८८५
१० रामचंद्र दादा पाटील गुळ रूपानें
३३ पुनमचंद शेट गहूं मण ८२ गुळ ५
२८
५ रूपचंद शेट तांदूळ पायली ८८४
१४ बाळा पुणेकर गहूं मण ८१
३० भर्डाविक्री मण ८२ दर १५ प्रमाणें
त्याजबदल जमा पुण्यतिथी कडून
८॥।. पत्रावळी पुण्यतिथीकडे विक्री.

३३९॥।≥

६ सर्पण मण ८१५ दर ८ प्रमाणे आले
२॥ भर्डा शिजविण्याबद्दल मजूरी
१ गर्डी २ नी मजूरी

३१९॥।-॥। एकूण खर्च.

२०८-। शिल्लक.

३३९॥।≥

श्री समर्थांचे चरणीं विनंती आहे कीं, आपले भक्तांना व आपले उत्सवास ज्यांनीं मदत केली त्यांस परलोकाचा उत्तम आशिर्वाद असावा श्रीचे चरणीं आणखी विनंती आहे कीं, वेळोवेळीं उत्सवाचे प्रसंगीं हजर राहाण्यास व संस्थेस कायम फंड जमा करण्यास सर्व भक्तांना प्रेरणा करावी. तारीख ७।१२।२४.

आपला चरणरज
तात्यापाटील कोते
रामचंद्र दादापाटील कोते

# अध्याय २७ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः ।। श्रीगुरुभ्यो नमः ।।
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।।
।। श्रीसद्गुरुसाईनाथाय नमः ।।

दृढ धरिल्या श्रीसद्गुरुचरण । घडे ब्रह्मादित्रैमूर्तिनमन ।।
साक्षात्परब्रह्माभिवंदन । स्वानंदघन सुप्रकट ।। १ ।।

मारितां एका सागरीं[1] बुडी । साधती सकल तीर्थपरवडी ।।
बैसतां गुरुपदीं देऊनि दडी । आतुडती बुडीं सकल देव ।। २ ।।

जयजयाजी साई सद्गुरू । जयजयाजी सायुज्यकल्पतरू ।।
जयजयाजी निजबोधसागरू । कथेसीं आदरू उपजवी ।। ३ ।।

मेघोदकालागी चातक । तैसे तव कथामृता भाविक ।।
सेवोत तुझे भक्त सकळिक । पावोत सुख सदैव ।। ४ ।।

परिसतां तव कथा निर्मळ । स्वेद अंगीं फुटो निखळ[2] ।।
नेत्रीं दाटो प्रेमजळ । प्राण पांगुळला राहो ।। ५ ।।

मना येवो गहिंवर । रोमांच उठोत वरचेवर ।।
रुदन स्फुंदन वारंवार । घडो सपरिवार श्रोतयां ।। ६ ।।

तुटून जावोत परस्परविरोध । सानथोर भेदाभेद ।।
हाच गुरुकृपावबोध । करावा शोध अंतरीं ।। ७ ।।

---

१ सागराचेतळीं. २ सर्वत्र.

येई न हा दृष्टी दावितां । सर्वेंद्रियां याची अगोचरता ॥
सद्गुरूवीण याचा दाता । न मिळे धुंडितां त्रिभुवनीं ॥ ८ ॥

कामादि शड् विकारोपशम । भक्तिभाव निःसीम प्रेम ॥
नुपजतां गुरुपदीं निष्ठा परम । होई न उद्गम अष्टभावां ॥ ९ ॥

भक्ताचें जें निजसुख । तेणेंचि गुरूसि परम हरिख[1] ॥
भक्त जों जों परमार्थोन्मुख । तों तों कौतुक गुरूतें ॥ १० ॥

देह गेह[2] पुत्र जाया । मी माझें हा व्याप वाया ॥
ही तों सर्व क्षणिक माया । जैसी छाया दुपारची ॥ ११ ॥

बाधूं नये मायेची गुंती[3] । ऐसें जरी असेल चित्तीं ॥
अनन्यभावें साईप्रती । शरणागती संपादा ॥ १२ ॥

लावावया मायेचा अंत । वेदशास्त्रीं टेकिले हात ॥
पाहील जो भूतीं भगवंत । तोचि तो निश्चित तरेल ॥ १३ ॥

सोडूनियां निजामशाई । धन्य तो पाटील चांदभाई ॥
सवें घेऊनि फकीर साई । आरंभीं येई नेवोंसिया[4] ॥ १४ ॥

तेथें वर्ष सहा मास । फकीराचा होई निवास ॥
तेथेंच कानड गांवींच्या कमास । सहवासास ठेवियलें ॥ १५॥

असो पुढें प्रसिद्ध टाकळी । घेऊन तेथिल दगडू तांबोळी ॥
कमा बावासमवेत ही मंडळी । तेथून आली शिर्डीस ॥ १६ ॥

जागोजागीं अपरिमीत । पवित्र स्थळें तीर्थें बहुत ॥
परी साईच्या भक्तांमत । शिरडीच अत्यंत पवित्र ॥ १७ ॥

जरी न दैवें येता हा योग[5] । कैंचा मग हा महाभाग ॥
आम्हा दीनां हा संयोग । महद्भाग्य हें अमुचें ॥ १८ ॥

१ हर्ष. २ गृह. ३ गुंतागुंत. ४ नेवाशांत. ५ हा साई समागम.

जे जे भक्त शरणागत । साधावया सत्कार्यार्थ ॥
साई तयांस दावी यथार्थ । सन्मार्गहितार्थ तयांच्या ॥ १९ ॥
तरी श्रोतां एकाग्रमन । होऊनि करा सच्चरितावर्तन ॥
तें हें परम गुरुकृपासाधन । चरित्र पावन साईचें ॥ २० ॥

गताध्यायीं निरूपण । एकास निजगुरुपदीं स्थापन ॥
अक्कलकोट स्वामीची खूण । एकास देऊन जागविलें ॥ २१ ॥

एकाचा चुकविला आत्मघात । युक्ति योजून अकल्पीत ॥
जीवदान दिधलें क्षणांत । ओढवला[१] देहांत टाळुनी ॥ २२ ॥

आतां या अध्यायीं कथन । कधीं साई कैसे प्रसन्न ॥
होऊन करीत अनुग्रहदान । सुखसंपन्न भक्तांस ॥ २३ ॥

दीक्षा प्रकार तो अद्भुत । कैसा कवणालागीं होत ॥
विनोद पूर्ण हांसत खेळत । श्रोते परिसोत सावचित्त ॥ २४ ॥

उपदेशाच्या अनेक रीती । मागां वर्णिल्या येच ग्रंथीं ॥
जैसी ज्याची ग्राहकस्थिती । मार्ग उपदेशिती तैसाच ॥ २५ ॥

वैद्य जाणे रोगाचें निदान । तयास ठावा मात्रेचा गुण ॥
रोग्यास नाहीं त्याची जाण[२] । आधीं आण गूळ म्हणे ॥ २६ ॥

गूळ गोड परी अपकारी । रोगी तदर्थचि हट्ट धरी ॥
घेई न वाटी औषधाची करीं । गूळ करावरि न ठेवितां ॥ २७ ॥

चाले न रुग्णावरा[३] सक्ती । वैद्य तेव्हां युक्ति योजिती ॥
आधीं गूळ मग औषध देती । परी साधिती निजकार्य ॥ २८ ॥

मात्र अनुपान तेवढें बदलती । जेणें गुळाचे दोष हरपती ॥
योजिलीं औषधें कार्यक्षम होती । तेच कीं रीती बाबांची ॥ २९ ॥

---

१ ओढवलेला २ जाणीव. ३ रोगी.

हाच नव्हे सर्वत्र नियम । अधिकार आणि मनोधर्म ॥
जैसी सेवा भक्त प्रेम । तैसाच उपक्रम अनुग्रहा ॥ ३० ॥

नवल बाबांची अद्भुत कृती । जेव्हां कोणा प्रसन्न होती ॥
तया मग ते अनुग्रह देती । कवण्या स्थिती तें परिसा ॥ ३१ ॥

आलें एकदां तयांचे चित्ता । ध्यानीं मनीं कोणाच्या नसतां ॥
सहज थट्टा विनोद करतां । भक्त कृतार्थता साधीत ॥ ३२ ॥

इच्छा उद्भवतां ग्रंथवाचनीं । सहज येई भक्तांच्या मनीं ॥
ग्रंथ बाबांच्या हातीं देऊनि । प्रसाद म्हणूनि तो घ्यावा ॥ ३३ ॥

पुढें मग त्या ग्रंथाचें वाचन । केलिया होईल श्रेय संपादन ॥
श्रोत्या वक्त्याचें परम कल्याण । प्रसादपूर्ण श्रवण तें ॥ ३४ ॥

कोणी दशावतार चित्रें । कोणी दशावताराचीं स्तोत्रें ॥
कोणी पंचरत्नी गीतेसम पवित्रें । पुस्तकें चरित्रें अर्पीत ॥ ३५ ॥

दासगणूही संतलीलामृत । भक्तलीलामृतही अर्पीत ॥
कोणी विवेकसिंधू ग्रंथ । बाबा ते देत शामातें ॥ ३६ ॥

पुस्तकें शामा हीं तुजला व्हावीं । म्हणती घरीं बांधून ठेवी ॥
शामानें आज्ञा शिरीं वंदावी । पुस्तकें रक्षावीं दप्तरीं ॥ ३७ ॥

आणूनि ऐसें भक्त मनीं । ग्रंथ आणीत दुकानांतुनी ॥
कीं बाबांचे हातीं देउनी । प्रसाद म्हणूनी मागावे ॥ ३८ ॥

स्वभाव बाबांचा जरी उदार । हेंही कराया लागे धीर ॥
नेती माधवरावांस बरोबर । करिती समोर तयांसी ॥ ३९ ॥

तयां करवीं बाबांचे हातीं । समय पाहूनि ग्रंथ देती ॥
बाबांस जैसी ग्रंथांची महती । तैसीच भक्त स्थिति ठावी ॥ ४० ॥

भक्तांनीं द्यावे ग्रंथ करीं । बाबांनीं चाळावे वरचेवरी ॥
भक्तांनीं घ्यावया ते माघारी । हस्त पुढारीं धरावे ॥ ४१ ॥

परी न बाबा तयांते देती । ते तो देती माधवरावांप्रती ॥
म्हणत शामा ठेव यापती । असूं दे संपत्ती तुजपाशीं ॥ ४२ ॥
शामानें पुसावें स्पष्टोक्ती । हे जे आतुरतेनें[1] हात पसरती ॥
त्यांच्या त्यांस देऊं का प्रती । तरी ते वदती नं ठेव ॥ ४३ ॥
एकदां भक्त काका महाजनी । आवड जयांस भागवत वाचनीं ॥
सर्व ग्रंथाची प्रत घेउनी । शिरडी लागूनि पातले ॥ ४४ ॥
माधवराव भेटूं आले । वाचूं म्हणून पुस्तक उचललें ॥
हातीं घेऊनी मशीदी गेले । सहज पुसियेलें बाबांनीं ॥ ४५ ॥
शामा हें हातीं पुस्तक कसलें । शामानें तें निवेदन केलें ॥
बाबांनीं तें हातीं घेतलें । परत केलें पाहून ॥ ४६ ॥
हेंच पुस्तक हीच प्रत । हेंच नाथांचें भागवत ॥
होतें श्रीकरप्रसादप्राप्त[2] । महाजनीप्रत पूर्वींच ॥ ४७ ॥
ग्रंथ नव्हे तो मालकीचा । आहे काका महाजनींचा ॥
वाचूं तात्पुरता जाहली इच्छा । स्पष्ट वाचा कळविलें ॥ ४८ ॥
तरीही बाबा वदती तयांला[3] । ज्याअर्थीं म्यां हा तुज दिधला ॥
ठेव तूं अपुले संग्रहाला । येईल कामाला दुसरीं ॥ ४९ ॥
असो पुढें कांहीं काळें । पुनश्च काका शिरडीस आले ॥
सर्व आणिक भागवत आणिलें । हस्तीं ओपिलें साईंच्या ॥ ५० ॥
प्रसाद म्हणून माघारा दिधलें । नीट जीव लाव आज्ञापिलें ॥
कीं तें जिवाभावाला अपुले । येईल आश्वासिलें काकांस[4] ॥ ५१ ॥
हेंच कामीं येईल अपुले । नको देऊं हें कोणास वहिलें ॥
ऐसें मोठ्या कळकळीनें कथिलें । सप्रेम वंदिलें काकांनीं ॥ ५२ ॥

१ उत्कंठेनें. २ श्रीसाईबाबांच्या हातानें प्राप्त झालेलें. ३ माधव-रावांला ४ काका महाजनी.

बाबा स्वयें अवाप्तकाम । पदार्थमात्रीं पूर्ण निष्काम ॥
भागवत जयांचा आचरता धर्म । संग्रहश्रम किमर्थ ॥ ५३ ॥

कोण जाणे बाबांचें मन । परी हें ग्रंथांचें संमेलन ॥
व्यवहारदृष्ट्या अति पावन । श्रवण साधन निजभक्तां ॥ ५४ ॥

शिरडी आतां स्थान पवित्र । देशीदेशींचे बाबांचे छात्र ॥
होतील वेळोवेळीं एकत्र । ज्ञानसत्र मांडितील ॥ ५५ ॥

तेव्हां हे ग्रंथ येतील कामा । दप्तरांतून दावील शामा ॥
स्वयें आपण जाऊं निजधामा । ग्रंथ प्रतिमा होतील ॥ ५६ ॥

ऐसे हे ग्रंथ परम पावन । असो शिरडी वा अन्य स्थान ॥
वाचितां भक्तास व्हावी आठवण । संग्रह कारण असेल हें ॥ ५७ ॥

असो रामायण वा भागवत । परमार्थाचा कोणताही ग्रंथ ॥
वाचितां रामकृष्णादिकांचें चरित । साईच दिसत मागें पुढें ॥ ५८ ॥

वाटे या ग्रंथांच्या विभूति । साईच नटला ते ते स्थिति ॥
श्रोते वक्ते नित्य देखती । समोर मूर्ति साईची ॥ ५९ ॥

ग्रंथ करिती गुरूस अर्पण । किंवा ब्राह्मणा करिती दान ॥
त्यांतही आहे दात्याचें कल्याण । शास्त्र प्रमाण ये अर्थीं ॥ ६० ॥

हें काय स्वल्प प्रयोजन । कीं जें शामास बाबांचें नियोजन ॥
त्यां हें ग्रंथ गृहीं नेऊन । दप्तरीं संरक्षण करावें ॥ ६१ ॥

जैसा शामा भक्त निःसीम । तैसेंच तयावर बाबांचें प्रेम ॥
तयास लावावा कांहीं नियम । उदेला काम साई मनीं ॥ ६२ ॥

तंव ते पहा काय करिती । जरी शामाची इच्छा नव्हती ॥
तरी तयावरी अनुग्रह करिती । कवण्या स्थिती तें परिसा ॥ ६३ ॥

१ ज्यांचें सर्व इच्छित प्राप्त झालेलें आहे असे. २ शिष्य.

एके दिवशीं मशीदीशीं । बुवा एक रामदासी ॥
होता नित्यनेम तयासीं । रामायणासीं वाचावें ॥ ६४ ॥
प्रातःकाळीं मुखमार्जन । स्नानसंध्या भस्मचर्चन ॥
करोनि भगवें वस्त्र परिधान । अनुष्ठान मांडावें ॥ ६५ ॥
विष्णुसहस्त्रनामावर्तन । मागून अध्यात्मरामायण ॥
पारायणावरी पारायण । श्रद्धापरिपूर्ण चालावें ॥ ६६ ॥
ऐसा कितिएक काळ लोटता । माधवरावांची वेळ येतां ॥
आलें साईसमर्थांचे चित्ता । काय ती वार्ता परिसावी ॥ ६७ ॥
फळली माधवरावांची सेवा । लावावा कांहीं नियम जीवा ॥
भक्तिमार्गाचा प्रसाद व्हावा । लाहो विसावा संसारीं ॥ ६८ ॥
ऐसें बाबांचे आलें मनीं । रामदासास जवळ बोलावुनी ॥
म्हणती पोटांत आली कळ उठुनीं । आंतडी तुटूनि पडत कीं ॥६९॥
जा, ही राही न पोटदुखी । आणकीं सत्वर सोनामुखी ॥
मारिल्याविण थोडीसी फकी । जाई न रुखरुखी पोटाची ॥ ७० ॥
रामदास विचारा भावार्थी । खूण घालून ठेविली पोथी ॥
गेला धांवत बाजाराप्रती । आज्ञावर्ती बाबांचा ॥ ७१ ॥
रामदास खालीं उतरले । इकडे बाबांनीं काय केलें ॥
तात्काळ आसनावरूनि उठले । जवळ गेले पोथीच्या ॥ ७२ ॥
तेथें इतर पोथ्यांत होती । विष्णूसहस्त्रनामाची पोथी ॥
उचलून बाबांनीं घेतली हातीं । आले मागुती स्वस्थाना ॥ ७३ ॥
म्हणती "शामा ही पोथी कंनी । आहे पहा बहुगुणी ॥
म्हणून देतों तुजलागुनी । ती त्वां वाचून पहावी ॥ ७४ ॥

१ बारीक चावटी. २ या नांवानें माधवरावांस बाबा हाक मारीत. ३ कीं नाहीं. ४ फार कल्याणकारी.

एकदां मज उपजली नडं । काळीज करूं लागलें धडधड ॥
झाली जीवाची चडफड । दिसे न धडगत माझी मज ॥ ७५ ॥

ऐसिया त्या प्रसंगाला । काय सांगूं शामा मी तुजला ॥
या पोथीचा जो उपयोग झाला । हा जीव तरला तिचेनीं ॥ ७६ ॥

अनेक उरीं निसावा दिला । तात्काळ हा जीव गार झाला ॥
अल्लाच वाटे पोटीं उतरला । जीव हा जगला तिचेनी ॥ ७७ ॥

म्हणोनि शामा ही तुजला नेई । ओजे ओजे वाचीत जाई ॥
रोज एकादें अक्षर घेई । आनंददायी ही मोठी" ॥ ७८ ॥

शामा म्हणे ही मजला नलगे । रामदास मज भरेल रागें ॥
तो म्हणेल शीच त्याचे मागें । कर्म वांत्रुगें हें केलें ॥ ७९ ॥

आधींच तो जातीचा पिसाट । माथेफिरू तापट खाष्ट ॥
किमर्थ व्हावी ही कळ फुकट । नको कटकट ही मातें ॥ ८० ॥

शिवाय पोथीची लिपी संस्कृत । माझी वाणी रांगडी कुश्चित ॥
जोडाक्षरहीं न जिव्हेस उलटत । उच्चार स्पष्ट होई न मज ॥ ८१ ॥

पाहूनि बाबांचें कृत्य सकळ । बात्रा लाविती वाटलें कळ ॥
बाबास शामाची केवढी कळकळ । शामास अटकळ नाहीं ती ॥ ८२ ॥

माझा शामा असेल खुळा । परी मजला तयाचा ळळा ॥
लोभ लावी जीवा आगळा । तयाचा कळवळा मज मोठा ॥ ८३ ॥

ही विष्णुसहस्त्रनाममाळा । बांधीन स्वहस्तें तयाचे गळा ॥
करीन तया भवदुःखा वेगळा । लावीन चाळा वाणीला ॥ ८४ ॥

---

१ पीडा. २ या विष्णूसहस्त्रनामाचा. ३ छातीवर, हृदयांत. ४ परमेश्वर. ५ हळूहळू. ६ खोटें (म्हणजे त्याचे परवानगी खेरीज त्याची पोथी घेणें हें). ७ वेडा.

नाम पापाचे पर्वत फोडी । नाम देहाचें बंधन तोडी ॥
नाम दुर्वासनेच्या कोडी । समूळ दवडी खोडुनी ॥ ८५ ॥

नाम काळाची मान मोडी । चुकवी जन्ममरण ओढी ॥
ऐसि या सहस्त्र नामाची जोडी । शाम्यास गोडी लागावी ॥ ८६ ॥

नाम प्रयत्नें घेतां चोखट । अप्रयत्नेंही नाहीं ओखट ॥
मुखासि आलें जरी अवचट । प्रभाव प्रकट करील ॥ ८७ ॥

नामापरीस सोपें आन । अंतःशुद्धीस नाहीं साधन ॥
नाम जिव्हेचें भूषण । नाम पोषण परमार्था ॥ ८८ ॥

नाम घ्यावया नलगे स्नान । नामासि नाहीं विधि विधान ॥
नामें सकळ पाप निर्दळण । नाम पावन सर्वदां ॥ ८९ ॥

अखंड माझेंही नाम घेतां । बेडा पार होईल तत्त्वतां ॥
नलगे कांहीं इतर साधनता । मोक्ष हाता चढेल ॥ ९० ॥

जया माझे नामाची घोकणी । झालीच तयाचे पापाची धुणी ॥
तो मज गुणियाहुनि गुणी । ज्या गुणगुणी[1] मन्नामीं ॥ ९१ ॥

हेंच बाबाचें मनोगत । तदनुसार मग ते वर्तत ॥
शामा जरी नको म्हणत । बाबा तें सारीत खिशांत ॥ ९२ ॥

वाडवडिलांची पुण्याई सबळ । तेणेंच साईकृपेचें फळ ॥
ऐसें हें सहस्त्रनाम निर्मळ । प्रपंच तळमळ वारील ॥ ९३ ॥

इतर कर्मा लागे विधि । नाम घ्यावें कधींही निरवधीं ॥
तया न अनध्याय प्रदोष बाधी । उपासना साधी नाहीं दुजी ॥ ९४॥

नाथांनींही येच रिती । एका अपुल्या शेजारियावरती ॥
हेंच सहस्रनाम मारोनि माथीं । परमार्थपंथीं सूदिलें ॥ ९५ ॥

---

१ सतत व हळू जप ( गुणगुण ).

नाथाघरीं नित्य पुराण । शेजारी जातीचा ब्राह्मण ॥
होता स्नानसंध्या विहीन । दुराचरण निमग्न ॥ ९६ ॥

कधीं करीना पुराण श्रवण । वाड्यांत पाऊल टेकीना दुर्जन ॥
नाथ होऊनिया सकरुण । केलें पाचारण तयास ॥ ९७ ॥

उंचवर्णी असोनि जन्म । वाया जातो हें जाणोनि वर्म ॥
नाथांस उपजली कृपा परम । कैसा हा उपरम पावेल ॥ ९८ ॥

म्हणोन तयानें नको म्हणतां । सहस्त्रनामाची दिधली संथा ॥
एकेक श्लोक पढवितां पढवितां । निजोद्धारता लाधला ॥ ९९ ॥ *

या सहस्त्रनामाचा पाठ[१] । चित्तशुद्धीचा मार्ग धोपट ॥
परंपरागत हा परिपाठ । तेणेंच ही अटाट बाबांना ॥ १०० ॥

तों आले रामदास जल्द । घेऊनि सोनामुखी अंगद ॥
अण्णा उभेच कलीचे नारद । वृत्तांत साद्यंत कळविला ॥ १०१ ॥

आधींच रामदास आर्ततायी । वरी नारदाची शिष्टाई ॥
मग त्या प्रसंगाची अपूर्वाई । कोण गाईल यथार्थ ॥ १०२ ॥

आधींच रामदास विकल्पमूर्ति । माधवरावाचा संशय चित्तीं ॥
म्हणे वळकावया माझी पोथी । बाबांना मध्यस्ती घातलें ॥ १०३ ॥

सोनामुखीची वार्ता विसरला । माधवरावावरी घसरला ॥
वृत्तिप्रकोप अनावर झाला । उदंड बरसला वाग्डंबर ॥ १०४ ॥

पोटदुखीचें हें ढोंग सगळें । तुवांच बाबांस उद्युक्त केलें ॥
माझ्या पोथीवर तुझे डोळे । हें न चाले मजपुढें ॥ १०५ ॥

---

* केशवस्वामीकृत श्री एकनाथस्वामीचें चरित्र अ. २७ ओ० ३४ ते ७१ पहा.

१ धडपड. कळकळ. २ औषध. ३ कै. वा. अण्णा चिंचणकर (दामोदर घनःशाम बाबरे). ४ फार रागीट. ५ कुतर्कांची प्रतिमा.

नांवाचा मी रामदास निधडा । पोथी न देतां गुणोघडा ॥
पहा हें मस्तक फोडीन तुजपुढा । घालीन सडा रक्ताचा ॥ १०६ ॥

तुझा माझे पोथीवर डोळा । स्वयेंच रचूनिया कवटाळा¹ ॥
घालिसी सकळ बाबांचे गळां । नामानिराळा राहून ॥ १०७ ॥

माधवराव बहु समजाविती । रामदासा नाहीं शांती ॥
तंव माधवराव सौम्य वृत्ति । काय वदती तें परिसा ॥ १०८ ॥

मी कपटी हा माझे माथां । मारूं नको रे प्रवाद वृथा ॥
काय तुझ्या त्या पोथीची कथा । नाहीं दुर्मिळता तियेला ॥ १०९ ॥

तुझ्याच पोथीला काय सोनें । किंवा हिरकणी जडली नेणें ॥
बाबांचाही विश्वास जेणें । धरिसी न जीणें धिक् तुझें ॥ ११० ॥

पाहूनि तयाचा अट्टाहास । बाबा मधुर बोलती तयास ॥
काय बिघडलें रे रामदास । व्यर्थ सायास कां वहासी ॥ १११ ॥

अरे शामा आपलाच पोरगा । तूं कां शिरा ताणिसी उगा ॥
किमर्थ इतका कष्टसी वाउगा । तमाशा जगा दाविशी ॥ ११२ ॥

ऐसा कैसा तूं कलहतत्पर । कां न बोलवे मधुरोत्तर ॥
अरे ह्या पोथ्या पढतांही निरंतर । अजुनि अंतरें अशुद्ध ॥ ११३ ॥

प्रत्यही अध्यात्मरामायण पढशी । सहस्रनामाचें आवर्तन करिशी ॥
तरी ही उच्छृंखलवृत्ती न त्यजिसी । आणि म्हणविशी रामदास ११४

ऐसा कैसा तूं रामदास । तुवां सर्वार्थीं असावें उदास ॥
परी तुटेना पोथीचा सोस । काय या कर्मास सांगावें ॥ ११५ ॥

रामदासीं नसावी ममता । सान थोरीं असावी समता ॥
त्या तुझी या पोरासीं विषमता । झोंबसी हाता पोथीस्तव ॥ ११६ ॥

---

१ षडयंगुणांनीं. २ कपटविद्या. ३ दोष. ४ मन. ५ लोभ.

जा बैस जाऊन स्थानावरी । पोथ्या मिळतील पैशा पायरी ॥
माणूस मिळेना आकल्पवरी । विचार अंतरीं राखावा ॥ ११७ ॥

तुझ्या पोथीची काय महती । शाम्याला त्यांत कैंची गती ॥
उचलली ती म्यांच आपमती । दिधली तयाप्रति मीच ती ॥ ११८ ॥

तुला ती तों मुखोद्गत । शाम्यास द्यावी आलें मनांत ॥
वाचील ठेवील आवर्तनांत । कल्याण अत्यंत होईल ॥ ११९ ॥

काय त्या वाणीची रसाळता । मधुरता आणि कनवाळुता ॥
तैसीच स्वानंदजळ शीतळता । अति अपूर्वता तियेची ॥ १२० ॥

रामदास उमगला चित्ता । म्हणे माधवरावास फणफणतां ॥
घेईन बदला पंचरत्नी गीता । हें तुज आतां सांगतों ॥ १२१ ॥

रामदास इतुका निवळला । माधवरावास आनंद झाला ॥
एकच काय मी दहा तुजला । गीता बदला देईन ॥ १२२ ॥

असो पुढें तो तंटा निवाला । गीताग्रंथ जामीन राहिला ॥
देव गीतेचा ज्यातें न कळला । गीता कशाला तयास ॥ १२३ ॥

साईसन्मुख अध्यात्मरामायण । पाठावर पाठ करी जो जाण ॥
त्या रामदासें साईसी तोंड देऊन । करावें भांडण कां ऐसें ॥१२४॥

हें तरी म्यां कैसें वदावें । दोष कोणास कैसे द्यावे ॥
झाले ते प्रकार जरी न व्हावें । महत्त्व ठसावें कैसेंनी ॥ १२५ ॥

इतुका झगडा लाविला ज्यानें । बाबांचेंही घालविलें दुखणें ॥
कल्याण आहे माझे जेणें । अलौकिक देणें साईचें ॥ १२६ ॥

जरी न होता हा सायास । बसता न माधवरावाचा विश्वास ॥
खरेंच चढतें न अक्षर जिव्हेस । पाठचि तयांस होतें ना ॥ १२७ ॥

---

१ रागानें तांबडालाल होऊन. २ नड, पिडा.

ऐसा हा साईनाथ प्रेमळ । खेळिया परमार्थाचा दुर्घट ।
दावील केव्हां कैसी फळ । करणी अकळ[1] तयाची ॥ १२८ ॥

पुढें शामाची निष्ठा जडली । दीक्षितें[2] नरकेयांही[3] संथा दिधली ॥
अक्षर ओळख करून घेतली । पोथी चढली जिव्हेवर ॥ १२९ ॥

असो हा माधवरावांचा वाद[4] । साई शुद्धबोधानुवाद ॥
परमानंद पूर्ण हा विनोद । निर्विवाद सुखदायी ॥ १३० ॥

एकदां काकासाहेब दीक्षित । नियमानुसार प्रातःस्नात ॥
असतां आसनस्थित ध्यानस्थ । दर्शन पावत विठ्ठलाचें ॥ १३१ ॥

पुढें जातां बाबांचे दर्शना । नवल बाबा पुसती तयांना ॥
विठ्ठल पाटील आला होता ना । भेट झाली ना तयाची ॥१३२॥

मोठा पळपुट्या तो विठ्ठल । मेख मारूनि करी अढळ ॥
दृष्टी चुकवूनि काढील पळ । होता पळ एक दुर्लक्ष ॥ १३३ ॥

हा तो प्रातःकाळीं प्रकार । पुढें जेव्हां भरली दुपार ॥
पहा आणीक प्रत्यंतर । विठ्ठल दर्शन सोहळा ॥ १३४ ॥

पंढरपुरच्या विठोबाच्या । छब्या पांचपंचवीस साच्या ॥
घेऊनि कोणी बाहेर गांवींचा । विकावयाच्या इच्छें ये ॥ १३५ ॥

सकाळीं ध्यानीं आली जी मूर्ति । तियेचीच संपूर्ण प्रतिकृती ॥
पाहूनि दीक्षित विस्मत चित्तीं । बोल आठवती बाबांचे ॥ १३६ ॥

दीक्षित तंव अति प्रीती । विकणारासी मोल देती ॥
छबी एक विकत घेती । भावें लाविती पूजेस ॥ १३७ ॥

---

१ कळण्यास अवघड. २ रा. रा. हरी सिताराम दीक्षित बी. ए. एल. एल. बी. ३ प्रोफेसर गणेश गोविंद नरके एम्. ए. ४ साईबाबाबरोबर झालेलें संभाषण.

तैसेंच ब्रह्मविद्या अभ्यासिती । तयांची वार्तांस मोठी प्रीती ॥
प्रसंगोपात्त अभिव्यक्ति । दाविती कैसी अवलोका ॥ १३८ ॥

एकदां जोगांची आली बंगी । शिरडी पोस्टांत टपालमार्गीं ॥
स्वीकारावया तया जागीं । लागवेगीं निघाले ॥ १३९ ॥

पुस्तक पाहती तों तें भाष्य । लोकमान्यांचें गीतारहस्य ॥
बगलेस मारून मशीदीस । दर्शनास पातले ॥ १४० ॥

नमस्कारार्थ खालवितां डोई । बंगीही पडली बाबांचे पायीं ॥
'बापूसाब ही कशाची काई' । बाबा ते ठायीं पूसती ॥ १४१ ॥

बंगी मग समक्ष फोडिली । कसली काय ती वार्ता कळविली ॥
ग्रंथासह बाबांचे हातीं दिधली । अवलोकिली बाबांनीं ॥ १४२ ॥

ग्रंथ काढोनि हातीं घेतला । क्षणार्धांत चाळून पाहिला ॥
खिशांतून एक रुपया काढिला । वरती ठेविला कौतुकें ॥ १४३ ॥

रुपयासह मग तो ग्रंथ । घातला कीं जोगांचे पदरांत ॥
म्हणाले हा वाच साद्यंत । कल्याणप्रद होईल ॥ १४४ ॥

ऐशा बाबांच्या अनुग्रह कथा ॥ वर्णितां येतील असंख्याता ॥
ग्रंथ पावेल अति विस्तृतता । म्हणोन संक्षिप्तता आदरीं ॥ १४५ ॥

एकदां शिरडींत ऐसें झालें । दादासाहेब खापरडे आले ॥
सहपरिवार तेथें राहिले । प्रेमें रंगले बाबांच्या ॥ १४६ ॥

खापर्डे नव्हेत सामान्य गृहस्थ । अति विद्वान मोठे प्रस्थ ॥
साई सन्निध जोडूनि हस्त । पायीं मस्तक खालवीत ॥ १४७ ॥

आंग्लविद्या पारंगत । धारासभेंत किर्तिमंत ॥
वक्तृत्वें सर्वांस हालवीत । मूग ते गिळत साईंपुढें ॥ १४८ ॥

भक्त बाबांचे असंख्यात । परी त्यां पाशीं मूकव्रत ॥
खापर्डे, नुलकर, बुट्टी व्यतिरिक्त । धरितां न भक्त आढळला ॥ १४९ ॥

इतर सर्व बाबांशीं बोलत । कांहीं तोंडासी तोंडही देत ॥
नाहीं भीडभाड मुर्वत । मूकव्रत तें यां तिघां ॥ १५० ॥

बोलण्याचीच काय कथा । बाबा सन्मुख न तुकविती माथा ॥
अवर्णनीय तयांची लीनता । श्रवण शालीनताही तैसी ॥ १५१ ॥

विद्यारण्यांची पंचदशी । समजून घ्यावी जयांपाशीं ॥
ते दादासाहेब मूकवृत्तीशी । धरीत मशीदीशी येतांच ॥ १५२ ॥

शब्दब्रह्माचें कितीही तेज । शुद्धब्रह्मापुढें निस्तेज ॥
साई परब्रह्ममूर्ति सतेज । विद्वत्ते लाज लावी ती ॥ १५३ ॥

चार महिने तयांचा वास । कुटुंब राहिलें सात मास ॥
दिवसेंदिवस उभयतांस । अति उल्हास वाटला ॥ १५४ ॥

कुटुंब मोठें निष्ठावंत । साईपदीं प्रेम अत्यंत ॥
साईस नित्य नैवेद्य आणीत । मशीदींत स्वहस्तें ॥ १५५ ॥

होई जों न नैवेद्य ग्रहण । बाईस तोंवर उपोषण ॥
महाराजांनीं केलिया सेवन । मागून जेवण बाईचें ॥ १५६ ॥

असो एकदां आली वेळ । बाबा परम भक्तवत्सल ॥
बाईची श्रद्धा पाहून अचळ । मार्ग सोज्वळ दावीत ॥ १५७ ॥

अनेकांच्या अनेक परी । बाबांची तों अगदींच न्यारी[1] ॥
हासतां खेळतां अनुग्रह वितरी[2] । जो दृढ अंतरीं ठसावे ॥ १५८ ॥

एकदां सांजा शिरापुरी । भात वरान्न[3] आणि खिरी ॥
सांडगे पापड कोशिंबिरी । बाईनें ताटभरी आणिले ॥ १५९ ॥

ऐसें तें ताट येतांक्षणीं । बाबा अति उत्कंठित मनीं ॥
कफनीच्या अस्तन्या वरी सारुनी । आसनावरूनी ऊठले ॥ १६० ॥

---

१ निराळी. २ देत. ३ वरण.

जाऊनि बैसले भोजनस्थानीं । घेतलें ताट सन्मुख ओढुनी ॥
वरील आच्छादन बाजूस सारुनी । अन्न सेवनीं उद्युक्त ॥ १६१ ॥
नैवेद्य येती इतरही बहुत । त्याहून सरस अपरिमित ॥
कित्येक वेळ ते पडून राहत । यावरीच हेत कां इतुका ॥ १६२ ॥
हीतो प्रपंचाची वार्ता । शिवावी कां संताचे चित्ता ॥
माधवरावजी साईसमर्था । म्हणती ही विषमता कां बरें ॥ १६३ ॥
अवघ्यांचीं ताटें ठेवूनि देतां । कोणाचीं चांदीचींही दूर भिरकावितां ॥
मात्र या बाईचें येतांच उठतां । खाऊं लागतां नवल हें ॥ १६४ ॥
हिचेंच अन्न कां इतुकें गोड । देवा हें आम्हांस मोठें गूढ ॥
काय तरी हें तुझें गारूड । आवडनिवड तुम्हां कां ॥ १६५ ॥
बाबा म्हणती सांगूं काई । काय या अन्नाची अपूर्वाई ॥
पूर्वीं[1] ही एका वाण्याची गाई । दुधाळ लई लठ्ठ असे ॥ १६६ ॥
मग ती कुठें नाहींसी झाली । माळियाकडे जन्मास आली ॥
तीच पुढें क्षत्रियाकडे गेली । पत्नी झाली वाणियाची ॥ १६७
पुढें ही उपजली ब्राह्मणापोटीं । बहुता काळानें पडली दृष्टी ॥
प्रेमाचे दोन घांस पोटीं । सुखसंतुष्टी जाऊंदे ॥ १६८ ॥
ऐसें म्हणूनि यथेष्ट जेवले । मुख आणि हात धुतले ॥
सहज तृप्तीचे ढेकर दिधले । येऊन बैसले गादीवर ॥ १६९ ॥
बाईनें मग करूनि नमन । आरंभिलें साईचरण संवाहन ॥
बाबांनीं ती संधी साधून । हितगुज सांगून राहिले ॥ १७० ॥
बाई जयांनीं जरण चूरी । दावीत ते कर बाबा स्वकरीं ॥
पाहूनि देवा भक्तांची चाकरी । करी मस्करी तंव शामा ॥ १७१ ॥
ठीक चाललें आहे कीं देवा । काय मौजेचा हा देखावा ॥
पाहूनि या परस्परांच्या भावा । वाटे नवलावा अत्यंत ॥ १७२ ॥

---

१ पूर्वील एका जन्मीं.

पाहोनि तीचा सेवा काम । प्रसन्न बाबांचें अंतर्याम ॥
हळूच म्हणती 'राजाराम । राजाराम' वद वाचे ॥ १७३ ॥
ऐसें म्हणत राही नित । सफल होईल आई जीवित ॥
शांत होईल तुझें चित्त । हित अपरिमित पावसील ॥ १७४ ॥
काय त्या वचनाची मात । हृदयांतरीं जाऊन खोंचत ॥
वचन योगेंच शक्तिपात । क्षणार्धांत करीत ॥ १७५ ॥
ऐसा कृपाळू श्रीसमर्थ । प्रणतपाळ साईनाथ ॥
पुरवी नित्य भक्तमनोरथ । साधी निजहित तयांचें ॥ १७६ ॥
अत्यंत हित अति प्रीती । अत्यंत लीन श्रोतयांप्रती ॥
कथितों मी तें धरा चित्तीं । करितों विनंती सलगीची ॥ १७७ ॥
लंपट गुळाचिये गोडी । सांडी न मुंगी तुटतां मुंडी ॥
तैसी द्या साईचरणीं दडी । कृपा परवडी रक्षील तो ॥ १७८ ॥
गुरू भक्त हे नाहीं वेगळे । दोघेही एकांग आगळे ॥
प्रयत्नें वेगळें करितां वळें । अभिमान गळे कर्त्याचा ॥ १७९ ॥
एकावाचून एक ठेला[1] । कच्चा गुरू तो कच्चाही चेला ॥
परी जो पक्या गुरूचा केला । द्वैतीं अबोला तयासीं ॥ १८० ॥
गुरू राही एक्या गांवीं । शिष्य तयाचा इतर गांवीं ॥
ऐसें जयाचें मन भावी । ते मानभावी[2] उभयही ॥ १८१ ॥
मुळींच जरी नाहींत दोन । वेगळीक मग ती कुठून ॥
एक न राहे एकावीण । इतुके अनन्य ते दोघे ॥ १८२ ॥
गुरुभक्तांत नाहीं अंतर । ऐसें वास्तव्य निरंतर ॥
गुरुपदावरि भक्त शिर । हाही उपचार स्थूलाचा ॥ १८३ ॥
भक्त अद्वैत भजनपर । गुरूही अद्वैत भक्तपर ॥
ऐसे न मीनतां[3] परस्पर । केवळ तो व्यवहार नांवाचा ॥ १८४ ॥

---

१ पदरीं तयार बनलेला. २ दिखाऊ. ३ समरसतां.

केसें लाधेल अन्नाच्छादन । क्षणमात्रही न करा चिंतन ।
हें तो सर्व प्रारब्धाधीन । प्रयत्नावीण आपाद्यें ॥ १८५ ॥
करूं जाल प्रयत्नें संपादन । तरी तो होईल व्यर्थ शीण ॥
प्रयत्नें व्हा परमार्थसंपन्न । चिंतन रात्रंदिन हें करा ॥ १८६ ॥
'उत्तिष्ठत' आणि 'जाग्रत' । गाढ निद्रेंत पडलां कां घोरत ॥
श्रुतिमाय तारस्वरें गर्जत । प्रेमें जागवीत भक्तांस ॥ १८७ ॥
सर्वानर्थ बीजभूत । अविद्यानिद्रेंत जे जे लोळत ॥
तयांनीं वेळीं होऊनि जागृत । गुरुज्ञानामृत सेवावें ॥ १८८ ॥
तदर्थ होऊनि अति विनीत । व्हा गुरुचरणीं शरणागत ॥
तो एक जाणे विहिताविहित । आम्हीं तों नेणत लेंकुरें ॥ १८९
साहंकार किंचिज्ञ जीव । निरहंकार सर्वज्ञ शिव ॥
दोघांठायीं अभेदभाव । व्हवया उपाव गुरु एक ॥ १९० ॥
अविद्योपाधि आत्मा जीव । मायोपाधि आत्मा शिव ॥
जाणें घालवूं हा भेदभाव । समर्थ गुरुराव एकला ॥ १९१ ॥
मन संकल्पविकल्पाधीन । करा साईपायीं समर्पण ॥
मग तेथून पावे जें स्फुरण । त्याचें अहंपण त्याजवळ ॥ १९२ ॥
तैसीच सकल क्रियाशक्ती । तीही समर्पा साईप्रती ॥
मग तो आज्ञापी जैसिया रीती । तैसिये स्थिती वर्तावें ॥ १९३ ॥
जाणा सकल साईची सत्ता । भार घालोनी तया वरता ।
कार्यें करितां निरभिमानता । सिद्धि ये हाता अविकळ ॥ १९४ ॥
परी म्हणाल मीं हें करीन । धराल अत्यल्पही अभिमान ॥
फळ येईल तात्काळ दिसोन । विलंब क्षणही न लागेल ॥ १९५ ॥

---

१ मिळणारें. २ काठकोपनिषद्. ३ योग्य काय अयोग्य काय.

मायामोह निशीस। या कुशीचे त्या कुशीस ॥
हेमाड असतां देतां आळेस । हरि गुरु कृपेस लाधला ॥ १९६ ॥
तें ही केवळ अदृष्टवशें। विना अभ्यास ना सायासें ॥
त्यांनींच केवळ निजोद्देशें। गौरविलें ऐसें यत्नें ॥ १९७ ॥
करावया भक्तोद्धार। करोनि निज चरित्र निर्धार ॥
बळेंच त्याचा ' धरोनि कर। ग्रंथ सविस्तर लिहविला ॥ १९८ ॥
अखंडानुसंधान सूत्र। अनन्य प्रेमपुष्पीं विचित्र ॥
गुंफोनिया हार मनोहर। अर्पूं सादर साईस ॥ १९९
मिळवूं स्वराज्यसिंहासन। होऊं स्वपदीं विराजमान ॥
भोगूं स्वानंद निरभिमान। सुखायमान निजांतरीं ॥ २०० ॥
ऐसें अगाध साई चरित्र । पुढील कथा याहून विचित्र ॥
दत्तावधान व्हा क्षणमात्र । श्रवण पवित्र करावया ॥ २०१ ॥
पुढें येईल अध्यायत्रयी। बाबा बैसूनि ठायींचे ठायीं ॥
दृष्टांताची अपूर्वाई। पहा नवलायी दावितील ॥ २०२ ॥
त्यांतील आरंभीचा अध्याय। लाला लखमीचंदाचा विषय ॥
प्रेमसूत्रें बांधून पाय। दाविला निजठाय तयास ॥ २०३ ॥
ब्र्हाणपूरस्थ बाई एक। तिचिया खिचडीलागीं कामुक ॥
होऊनि केलें दर्शनोत्सुक। दाविलें कौतुक प्रेमाचें ॥ २०४ ॥
पुढें मेघाचिया स्वप्नांत। त्रिशूळ काढाया झाला दृष्टांत ॥
तयापाठीं अकस्मात। लिंग हो प्राप्त शंकराचें ॥ २०५ ॥
ऐसऐसिया अनेक कथा। येथून पुढें येतील वार्ता ॥
भक्तिपूर्वक ऐकतां श्रोतां। श्रवण सार्थकता होईल ॥ २०६ ॥

---

१ शरीरास आळेपिळे. २ दैववशात् ३ आत्मस्वरूपरूपी स्वराज्य. ४ तीन अध्याय. ५ या नावाचा श्रीचा निःसीम भक्त होऊन गेला तो.

सैंधव सिंधू निमज्जन । तैसा हेमाड साईस शरण ॥
सोहंभावाचें अभिन्नपण । त्या अनन्यपणें नमन करी ॥ २०७ ॥

वरी करी प्रेमें विनवण । लागो अहर्निश साईचें ध्यान ॥
त्याबीण ध्यानीं न रिघो आन । मन सावधान असावें ॥ २०८ ॥

होवो मागील परिहार । पुढील निर्दळून जावा पार ॥
अवशेष जें मध्यंतर । राहो निरंतर गुरु पायीं ॥ २०९ ॥

इति श्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरिचिते ॥
श्रीसाई समर्थ सच्चरिते । दीक्षानुग्रहदानंनाम
सप्त विंशतितमोध्यायः संपूर्णः ॥

॥ श्री सद्गुरू साईनाथार्पणमस्तु । शुभं भवतु ॥

---

१ मिठाचा खडा.

# आमची विनंति

श्री साईलीलेच्या दुसऱ्या वर्षाचा शेवटचा अंक आज आम्ही वाच-
कांचे हातीं देत आहोंत. ज्या सद्गुरूंच्या प्रेरणेनें या मासिकास दोन वर्षां-
पूर्वी सुरवात झाली, त्यांच्याच कृपाछत्राखालीं त्यानीं दोन वर्षे पुरीं झालीं.
मध्यंतरीं अतिक्रमास आल्यामुळें, गेल्या दोन वर्षांत २४ च्या ऐवजीं
१६ अंक आम्ही वाचकांना दिले. कांहीं अंकांतून निरनिराळ्या देवस्थानांचीं
चित्रें दिलीं. पुढील वर्षांत आम्ही आणखी कांहीं नवीन उपक्रम करण्याचें
योजिलें आहे. अपुरे वर्गणीदार, प्रोत्साहनाची वाण आणि श्रीसाईभक्तांचें
औदासिन्य इतक्या अडचणींतूनही आम्ही ही सद्गुरूंची सेवा दोन वर्षें
अखंडितपणे केली. आतां आमचे जवळील सामुग्री फार तर आणखी
एक वर्षभर पुरेल व नंतर आम्हाला आमच्या प्रिय वाचकांची कदाचित
कायमची रजा घ्यावी लागेल. चालू वर्ष संपत आलें, त्याचे बाराही अंक
आम्ही दिले तरी अद्यापि कांहीं ग्राहकांकडून या वर्षाच्या वर्गणीची रक्कम
येणें बाकी आहे. कांहीं सदय ग्राहकांनीं तर या वर्षाच्या सुरुवातीचे दोन
अंक घेऊन आधीं सूचना देऊन तिसरा अंक व्ही. पी. नें पाठविला अस-
तांही त्याची व्ही. पी. बेधडक परत केली व आम्हाला व्ही. पी. चा भुर्दंड
देण्यास लाविलें. आमचे प्रिय ग्राहकहो, असें यापुढें करूं नका. वर्गणी ती
किती अल्प. फक्त तीन रुपये सहा आणे. म्हणजे महिना फक्त साडेचार
आणे. अगदींच कोणी निष्कांचन असेल त्यालाच ही अल्प वर्गणी जड वाटेल.
आमची सर्व ग्राहकांना नम्र विनंती आहे कीं, कृपा करून तिसऱ्या वर्षाची
वर्गणी रु. ३।=) चैत्र अखेर आमचेकडे मनीआर्डरनें पाठवून द्या. त्यांत
आपले -।- वांचतील. ज्यांचे कडून याप्रमाणें वर्गणी न येईल, त्यांना
पुढील अंक आगाऊ सूचना देऊन आम्हीं रु. ३॥=) व्ही. पी. पाठवूं. मात्र
कृपा करून व्ही. पी. परत करून आम्हांला नुकसानींत घालूं नका.
पुढच्या वर्षाकरितां अंक चालू ठेवण्याची आपली इच्छा नसेल,
तसें आम्हांला आगाऊ कळवा, पण व्यर्थ आमचे चार आणे
फुकट वांया दवडूं नका.

संपादक
श्रीसाईलीला.